## प्रकरण - पाचवे

# देवदासी प्रथेविरुध्द स्वातंत्र्योत्तर काळात झालेले प्रयत्न

## प्रकरण - ५

# देवदासी प्रथेविरुध्द स्वातंत्र्योत्तर काळात झालेले प्रयत्न

स्वातंत्र्यपूर्वकाळात देवदासी प्रथा नष्ट करण्यासाठी महात्मा फुले, डॉ. रामकृष्ण भांडारकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, शिवराम जानबा कांबळे, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रयत्न केले होते. स्वातंत्र्याच्या काळातही महात्मा गांधीजीच्या चळवळीतील कार्यकर्ते काका कारखानीस यांनी देवदांसीसाठी कर्नाटकामध्ये आश्रम स्थापन करुन देवदासी मुक्ती चळवळीला हातभार लावला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देखील वेळोवेळी भाषणे देऊन, परिषदा भरवून या प्रथेला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांच्या मृत्यूनंतर १९५६ च्या नंतर या चळवळीकडे कुणीच फारसे लक्ष न दिल्याने ती चळवळ बरीच वर्षे दुर्लक्षीत राहीली होती.

पुढे स्वातंत्र्योत्तर काळात या चळवळीला गती मिळाली. या काळात देवदासी पुनर्वसन चळवळीची मुहूर्तमेढ खऱ्या अर्थाने देवदासी मुक्ती संघटनेचे अध्यक्ष प्रा. विठ्ठल बन्ने यांनी रोवल्याची दिसून येते

### २७ नोव्हेंबर १९६९ मधील मंगेशी येथील देवदासींची पहिली सभा

प्रा. विठ्ठल बन्ने यांनी गोव्यातील मंगेशीच्या मंदिरात २७ नोव्हेंबर १९६९ देवदासींची पहिली सभा घेतली. जरी त्यांनी गोव्यामध्ये ही सभा घेतली असली तरी ते मुळचे गडहिंग्लज येथील आहेत. गोवा, सावंतवाडी, मालवण या ठिकाणी व खुद्द गोव्यातील रवळनाथ, मंगेशी येथील देवळाला भाविणी, नायकिणी, देवळी सोडण्याचे प्रयत्न जास्त होते. म्हणून प्रा.विठ्ठल बन्ने यांनी ही सभा भरवून तेथील जनतेला आपल्या मुलींना भाविणी, नायकिणी म्हणून सोडू नका असे आवाहन करुन ही प्रथा किती अनिष्ट, आहे हे दाखवून दिले. त्यावेळी त्यांच्या भाषणाचा परिणाम काही भाविणीवर पडला व त्या या अनिष्ट प्रथेतून बाहेर पडल्या. त्यानंतर प्रा. विठ्ठल बन्ने यांनी गडहिंग्लज, निपाणी, बेळगाव, सौंदत्ती, कोल्हापूर, सांगली इ. ठिकाणी फिरुन लहान मोठया प्रचार सभा व निरनिराळया परिषदांचे आयोजन करुन त्या-त्या भागातील देवदासींची संघटना स्थापन केली.[१]

खऱ्या अर्थाने १९६९ च्या गोव्यातील मंगेशी येथे झालेल्या पहिल्या बैठकीपासून या प्रथेच्या विरुध्दाच्या लढाईस प्रारंभ झाला असे दिसते.

## १९७५ मधील देवदासी पुनर्वसनाची पहिली परिषद

डॉ. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखाली महात्मा फुलें प्रतिष्ठानाने गडहिंग्लज येथे १९७५ मध्ये देवदासी पुनर्वसनाची पहिली परिषद भरविली. या परिषदेला महाराष्ट्रातील व कर्नाटकातील हजारो देवदासी उपस्थित होत्या. यावेळी देवदासींच्या प्रश्नावर, त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय, आत्याचारावर चर्चा होऊन पुढील ठराव पास करण्यात आले.

**ठराव नं. १** - महाराष्ट्र व कर्नाटक सीमा भागात मुलींना देवाला सोडण्याची अनिष्ट प्रथा चालू आहे. मुलींना सौंदत्ती येथील जत्रेत आणि अनेक खेडयातून देवीला सोडून त्यांचे जीवन बरबाद केले जाते. धार्मिक बाबतीत हस्तक्षेप नको या सबबीखाली आजची लोकनियुक्त सरकारे या प्रथेबाबत काहीच पावले उचलत नाहीत. स्वातंत्र्योत्तरकाळात दोन्ही सरकारांनी या १९३४ च्या कायदयाखाली एकही खटला भरला नाही ही अतिशय निषेधार्ह बाब आहे तरी ही प्रथा मोडण्यासाठी १९३४ च्या कायदयाची कडक अंमलबजावणी करावी अशी मागणी ही परिषद करीत आहे.

**ठराव नं. २** - देवदासींचा प्रश्न हा स्त्रीमुक्तीचा प्रश्न आहे. हा आपल्या सांस्कृतिक जीवनास लागलेला कलंक आहे. असे समजून दोन्ही प्रांतातील कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन कार्य करावे. महाराष्ट्र व कर्नाटक सरकारने याकामी सुसूत्रपणे प्रयत्न करावेत. त्यासाठी त्यांनी कायदेशीर अधिकार असलेले देवदासी पुनर्वसन बोर्ड निर्माण करावे.

**ठराव नं. ३** - मागासपणा, अंधश्रध्दा, दारिद्रय यांचा फायदा घेऊन मुंबई, दिल्ली, मद्रास यासारख्या शहरातील दलाल या भागात येऊन पालकांना प्रलोभने दाखवून मुली देवाला सोडायला भाग पाडतात. दलालांच्या या कारवायांवर शासनाने कायदेशीर कारवाई करावी.

**ठराव नं. ४** - देवदासींची जातीनिहाय शिरगणती शासनाने करावी याचा उपयोग त्या प्रश्नांची व्याप्ती कळावी, उपाययोजना करणे सुकर व्हावे यादृष्टीने होईल.

**ठराव नं. ५** - देवदासींचे पुनर्वसन (अ) देवदासींच्या मुलींना बऱ्याचवेळा आईचे नाव लावावे लागते. त्यामुळे मागासवर्गीय असूनही त्यांना शासनाच्या सवलती मिळत नाहीत. तर ही तांत्रीक अडचण दूर करुन त्यांना सवलती मिळाव्यात. तसेच सर्वच जातीच्या देवदासींच्या मुलामुलींना मागासवर्गीयांसाठी असलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक सवलती मिळाव्यात (ब) या अनिष्ट प्रथेत अडकलेल्या देवदासींना अंधश्रध्देवर

आधारीत असलेल्या व्यवसायावर उपजीविका करावी लागते. तरी त्यांना या व्यवसायातून बाहेर काढण्यासाठी व सन्मान्य व्यवसायात त्यांचे पुनर्वसन होण्यासाठी सरकाने पावले उचलावीत.

<u>ठराव नं. ६</u> - निपाणी, बेळगाव, कोल्हापूर या शहरातून देवदासींच्या मुलांमुलींसाठी स्वातंत्र्य वसतिगृहे शासनाने उभी करावीत.

<u>ठराव नं. ७</u> - जोगतिर्णीच्या प्रथेप्रमाणे खंडोबाला वाहिल्या जाणाऱ्या मुरळया, गोव्यातील भाविणी या प्रथाही सरकारने बंद पाडाव्यात.

<u>ठराव नं. ८</u> - आपल्या आईने 'झुलवा' लावून घेतलेल्या इसमाकडून वारसा हक्क मिळाला पाहिजे.

<u>ठराव नं. ९</u> - सर्व वयोवृध्द देवदासींना पेन्शन मिळावी अशी मागणी ही परिषद करीत आहे.[२]

अशाप्रकारचे ठराव १९७५ च्या देवदासींच्या पहिल्या परिषदेत पास करण्यात येऊन ते पुढील कार्यवाहीसाठी महाराष्ट्र व कर्नाटक सरकारकडे पाठविण्यात आले.

ज्यावेळी १९७५ साली गडहिंग्लजमध्ये देवदासी पुनर्वसनाची पहिली परिषद झाली त्यावेळी बऱ्याच देवदासी पुढे आल्या व मेळावे,परिषदा,संमेलने इ. व्यासपीठावरुन आपले समस्या सांगू लागल्या. त्याचवेळेस भांडवलदारी वर्गाने ही चळवळ निष्क्रिय बनविण्यासाठी या चळवळीमध्ये सहभागी असलेल्या लोकांवर दडपण आणू लागले. त्यामुळे या दृष्टिचक्रात सापडलेल्या देवदासी स्त्रिया उदासीनतेने ग्रासलेल्या असल्याने त्यांच्यापुढे कुठल्याही दुसरा पर्याय नसल्यामुळे त्या जुन्या सोडलेल्या धंदयाला, रुढीला परत कवटाळून बसल्या. त्यामुळे या लढयाची शोकांतिका फार विचित्र झाली व होत आहे. याची नोंद पुनर्वसनाच्या माध्यमातून झाली पाहिजे.[३] असे मत श्री. बळवंत कांबळे यांनी व्यक्त केलेले आहे.

जरी देवदासी पुनर्वसनाच्या पहिल्या चळवळीमध्ये कार्यकर्त्यांना बऱ्याच अडचणी आल्या तरी त्यांनी उदासीनतेने ग्रासलेल्या देवदासींमध्ये एक नवा आत्मविश्वास निर्माण केला. त्यामुळेच त्यांच्यामध्ये संघटन निर्माण होऊन त्यांनीही या पुनर्वसनाच्या चळवळीला मोठया प्रमाणात पाठिंबा दिल्याचे दिसून येते.

देवदासी पुनर्वसनाच्या चळवळीला आता व्यापक स्वरुप आले होते. देवदासी प्रथा नेमकी काय आहे ? ती दलितांमध्येच का आहे ? त्यांच्या समस्या काय आहेत की ज्यांच्यामुळे त्या स्वत:हून देवदासी बनतात किंवा घरातील इतर मंडळी हे देवदासीपण त्यांच्यावर लादतात. या सर्व प्रश्नांचा परिपूर्ण अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक समिती नेमण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १९७९ मध्ये महाराष्ट्र

शासनाने देवदासींच्या प्रश्नांचा सर्वांगीण अभ्यास करुन त्याबद्दल उपाययोजना, काही तरतुदी सुचविण्याकरिता मंत्री ना. प्रकाश आवाडे यांच्या अध्यक्षतेखाली एक अभ्यास समिती नेमली. त्या समितीवर डॉ.बाबा आढाव (पुणे),प्रा. विठ्ठल बन्ने (गडहिंग्लज), प्रा.डॉ. अच्युत माने व प्रा. सुभाष जोशी (निपाणी),श्रीपतराव शिंदे,बापू मेस्त्री (गडहिंग्लज),सौ.साधना झाडबुके (कोल्हापूर),कै.सलमा शिराळकर (सांगली), आणि गौराबाई सालवदे (गडहिंग्लज) यांची नियुक्ती केली.[४] या समितीच्या कार्यकर्त्यांच्या प्रयत्नांमुळेच पुढे १५ जून, १९८० मध्ये निपाणी येथे देवदासी पुनर्वसनाची दुसरी परिषद घेण्यात आली

## १५ जून १९८० मधील देवदासी पुनर्वसनाची दुसरी परिषद

१५ जून १९८० ला निपाणी येथे प्रा. सुभाष जोशी यांच्या पुढाकाराने देवदासी पुनर्वसनाची दुसरी परिषद घेण्यात आली. या परिषदेला प्रा.विठ्ठल बन्ने, डॉ. बाबा आढाव, डॉ. अनिल अवचट, डॉ.अच्युत माने इ. मंडळी उपस्थित होती.[५] या परिषदेचा प्रभाव देवदासी स्त्रियांवर मोठया प्रमाणात पडला होता. या परिषदेत मागासवर्गीयांच्या सर्व सवलती देवदासीच्या मुलांना मिळाव्यात अशी मागणी करण्यात आली होती. यापूर्वी पहिल्या परिषदेमध्ये ही मागणी केली होती. कारण अस्पृश्य मुलांना जे भोगावे लागते, त्यापेक्षा वेगळे दु:ख देवदासींच्या मुलांना सहन करावे लागते. 'अनौरसपणा' ही बाब या कोवळया जीवांचे भावनिक, मानसिक व सामाजिक खच्चीकरण करणारी आहे. दारिद्रयरेषेखाली जगणाऱ्यांची संख्या वाढते, तसेच देवदासींचे व त्यांच्या मुलांचे प्रमाण वाढतेच आहे. बाल गुन्हेगारीचा प्रश्न, या प्रश्नांशी निकट संबंध प्रस्थापित करणारा आहे. अर्धवट वयाची ही मुले समाजविघातक गोष्टी करुन पोट भरतात. या किडलेल्या कळयांचे प्रमाण किती वाढले आहे. याची आकडेवारी भयानक आहे.अनाथश्रम, बालगुन्हेगारांसाठी संस्था काढल्या तर चार/दोन मध्यमवर्गीयांच्या पोटापाण्याची सोय होते. या मुलांच्या भविष्याचा प्रश्न तसाच अनुत्तरित राहतो. दलित संघटनासारख्या हया मुलांमुलींच्या संघटना बांधल्या जाऊ शकत नाहीत, याची कारणे विखुरलेला समाज, आपण 'बिनबापाचे' आहोत हे जगाला सांगण्याची लाज वाटते इ.होत.[६]

वरील आशयावरुन देवदासींच्या मुलांची परिस्थिती अतिशय वाईट स्वरुपाची असल्याचे दिसते. बऱ्याचवेळेला मागासवर्गीय असूनसुध्दा त्यांना शासनाच्या सवलती मिळत नाहीत. कालातंराने हीच मुले गुंड बनतात मग खून, दरोडे, असे समाजविघातक प्रकार करु लागतात. त्यातच त्यांची बिनबापाचे पोरे म्हणून समाजाकडून हेटाळणी होते.त्याच्या आईला वेश्या, रखेली असे शब्द उच्चारले जातात. यातून

बाहेर पडण्यासाठी ही मुले गुन्हेगारी प्रवृत्तीकडे झुकतात. म्हणून शासनाने त्यांना योग्य त्या सवलती उपलब्ध करुन दयाव्यात ही काळाची गरज आहे असे दिसते.

## ३० जून १९८० मध्ये महात्मा फुलें प्रतिष्ठानाने भरवलेली बेलापूर मधील मुरळी परिषद

३० जून १९८० रोजी अहमदनगर जिल्हयातील बेलापूर येथील माळवदे वाडयात महात्मा फुलें प्रतिष्ठानाचे अध्यक्ष डॉ.अनिल अवचट यांच्या अध्यक्षतेखाली वाघ्या मुरळयांची परिषद पार पडली. या परिषदेत श्रीरामपूर, नेवासे, राहूरी, पाथर्डी या तालुक्यातील व सातारा, बारामती भागातले १५० वाघे व ५० मुरळया उपस्थित होत्या. या परिषदेमध्ये वाघ्यामुरळयांनी आपल्या समस्या सांगितल्या. त्यानंतर अध्यक्षपदावरुन डॉ. अनिल अवचट म्हणाले, ''खंडोबाच्या नावाने मुली सोडून मुरळयांचे आयुष्य बरबाद करण्याची प्रथा थांबली पाहिजे ते बेकायदेशीर आहे. त्यातून प्रगतीचा मार्ग नाही. करमणुकीची नवी साधने आल्याने दिवसेंदिवस जागरणाची आवड कमी होत जाणार आहे. तेव्हा ती बुडती बोट सोडून वाघ्या - मुरळयांनी आधुनिक व्यवसायात शिरले पाहिजे. त्यासाठी सरकारने या समाजाच्या शिक्षणाची, धंदेशिक्षणाची, कर्ज वाटपाची, विशेष सोय करुन वर येऊ पाहणाऱ्या या समाजास हात देऊन त्यांचे पुनर्वसन केले पाहिजे. शेवटी परिषदेच्या अखेरीस वाघ्यामुरळयांची संघटना स्थापन होऊन पुढील ठराव पास करण्यात आले. १) वाघ्या मुरळी समाजाचा मागासवर्गीय जातींच्या यादीत समावेश व्हावा. २)वाघ्या मुरळयांच्या पुनर्वसनासाठी सरकारने तातडीने पावले उचलावीत. ३) जागरणासाठी जाणाऱ्या मुरळयावर आत्याचार झाल्यास तातडीने पोलीस चौकशी व्हावी. गुन्हेगारांवर खटले भरले जावेत व मुरळयांना पोलीस संरक्षण मिळावे. ४) मुलींना मुरळया म्हणून सोडणे ताबडतोब बंद व्हावे त्याबाबत सरकारने देवदासी संरक्षण कायदयाची कडक अंमलबजावणी करावी. ५) जागरणातील अश्लील गाणी, हावभाव, नाच हे कुणीही वाघ्यामुरळयांनी करण्याचे नाकारावे.[७] अशाप्रकारचे ठराव ३० जून १९८० च्या बेलापूर परिषदेमध्ये करण्यात आले होते.

या परिषदेला वाघ्या -मुरळयांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. डॉ.अनिल अवचट यांनीही वाघ्या-मुरळयांना नीतिचे जीवन जगण्याचा, गोंधळ, जागरण न करता आधुनिक व्यवसायात शिरण्याचा मोलाचा संदेश दिला. याशिवाय ज्यावेळी मुरळी जागरणात नाचते त्यावेळी पुरुष मंडळी दारु पिऊन मुरळयांना सिनेमातली गाणी म्हणायला व तसेच नाचायला लावतात. काही वेळा ते मुरळयांवर अतिप्रसंगही करतात.

अशी तक्रार या परिषदेत मुरळयांनी केली होती. कदाचित या तक्रारीचा गांभीर्याने विचार करुन महात्मा फुलें प्रतिष्ठानाच्यावतीने डॉ. अनिल अवचटांनी वरील प्रकारचे ठराव पास केलेले असावेत असे दिसते.

## १९८१ चा प्रोहिबिशन ऑफ डेडिकेशन ॲक्ट

देवदासी मुक्ती संघटनेच्या कार्यकर्त्यांनी वरील परिषदांचे आयोजन करुन हया प्रथेला आळा घालण्याचा प्रयत्न केला. पण तरीही देवदासी होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले होते. एका देवदासीचे पुनर्वसन होईपर्यंत दुसरी देवदासी तयार होत होती. केवळ जोगवा मागून पोट भरता येत नाही. म्हणून त्या देवाच्या नावाने उघडपणे वेश्याव्यवसाय करु लागल्या होत्या. त्यामुळे दिवसा ईश्वर सेवा व रात्री देहसेवा असा प्रकार सुरुच राहिला. १०-१२ रुपये मिळविणाऱ्या देवदासी एका रात्रीतून १००-२००/- रुपये मिळवू लागल्या. कर्नाटकात ही प्रथा फार फोफावली. म्हणून जनता सरकारच्यावतीने १९८१ ला देवदासी प्रोहिबिशन ऑफ डेडिकेशन ॲक्ट मंजूर करण्यात आला. या कायदयामुळे देवदासी करणाऱ्यास २ ते ५ हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. पण हे होण्यासाठी विविध संघटनांना अथक परिश्रम करावे लागले. त्यात जॉईट विमेन्स ऑर्गनायझेशन, कर्नाटक दलित ॲक्शन कमिटी, इंडियन हेल्थ ऑर्गनायझेशन, विमोचना इ. संस्था अग्रभागी होत्या. पण तरीही धार्मिक अंधश्रध्दा आणि व्यवसाय यामुळे कायदा प्रभावी झालेला होता असे दिसत नाही. [८]

अशाप्रकारे जरी कर्नाटकाने सरकारने १९८१ चा कायदा करुन देवदासी करणाऱ्याला दंड ठोकाविला असला तरी या कायदयामुळे देवदासी प्रथा संपुष्टात आली नाही. आज देखील कर्नाटक व महाराष्ट्रामध्येही कायदयाची बंदी असल्याने बऱ्याचवेळेला मुलींना देवाला सोडण्याचा विधी तिच्या घरांमध्ये करुन तिला छुप्यापध्दतीने सोडले जाते. म्हणजेच या प्रथेने कायदयातून पळवाटा काढल्याचे दिसून येते. एकंदरीत ही प्रथा बंद करण्यासाठी काही ठोस कार्य झाले पाहिजे यासाठी महाराष्ट्र व कर्नाटकातील बऱ्याच सामाजिक संस्था कार्य करताना दिसतात. देवदासींमध्ये आर्थिक, धार्मिक सुधारणा, आत्मजागृती झाल्याशिवाय ही प्रथा संपुष्टात येणार नाही याचीही जाणीव सामाजिक संस्थांना होती. त्यातूनच पुढे देवदासींचे संघटन करुन त्यांच्यावतीने सौंदत्तीच्या डोंगरावर काही निदर्शने झाल्याचे दिसून येते.

देवदासींच्या वतीने १९८४ मध्ये प्रबोधनासाठी सौंदत्तीला निदर्शने करण्यात आली. 'बिड ब्याडरी अप्पा देवरंगे मक्कळ बिड ब्याडरी' म्हणजे देवीला मुली सोडू नका रे बाबांनो! अशा घोषणा देण्यात आल्या

तरीही, 'यल्लव निन्न महालक उदो उदो' या कानडी मंडळीच्या उद्‌घोषापेक्षा 'उदे ग आई उदे' म्हणणारा मराठी जयजयकारच सर्वत्र ऐकू येतो. यावरुन महाराष्ट्रात या प्रथेचा प्रभाव वाढता आहे असे दिसते.[९]

## महात्मा फुलें प्रतिष्ठान व देवदासी मुक्ती संघटना आयोजित व्दिभाषीक मेळावा १९८४

सौंदत्तीच्या डोंगरावर अल्पवयीन मुलींना रेणुका देवीला वाहण्याचे प्रमाण जास्त आहे हे समजल्यानंतर १५-१६ फेब्रुवारी १९८४ ला सौंदत्तीच्या डोंगरावर भरलेल्या यात्रेच्या गर्दीची संधी साधून 'देवदासी मुक्ती संघटना' आणि महात्मा फुले समता प्रतिष्ठानांच्या वतीने व्दिभाषीक (मराठी व कानडी) मेळावा आयोजित करण्यात आला होता. कर्नाटक व सीमा भागातील प्रभाव क्षेत्रातील बरीच लोकांची गर्दी होत असल्याने देवदासी पुनर्वसनाच्या माध्यमातून दोन्ही राज्यांतून एकाचवेळेस मेळावा घेण्यात आला. सदरच्या मेळाव्याला डॉ. बाबा आढाव, प्रा. विठ्ठल बन्ने, डॉ.अनिल अवचट, डॉ. नरेंद्र दाभोळकर, छाया दातार, उत्तम कांबळे इ. कार्यकर्ते मंडळी उपस्थित होती. एकूणच या मेळाव्यात देवदासींना हुपरी येथील भूखंडावर चांदीचे दागिने बनविण्यासाठी प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात यावी. त्यासाठी ५०० घरकुलाची पूर्तता करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने पुढाकार घ्यावा याचीही चर्चा करण्यात आली होती.[१०] तसेच त्यावेळी मेळाव्याबरोबर जटा निर्मूलनाचे कामही मोठया प्रमाणात झाल्याचे आढळून येते.

## सावली संस्थेचे कार्य व जटा निर्मूलनाची गती

निपाणीमध्ये ऑक्टोबर १९८४ साली स्थापन झालेली सावली संस्था ही निरापराध देवदासींना आधार देण्याचे केंद्र बनले आहे. संवेदनशील आणि जागृत देवदासींच्या धडपडीमधून या संस्थेने जन्म घेतला होता. निपाणी येथील बेरड समाजातील सुशिला नाईक या देवदासीने सावली संस्थेचे नेतृत्व स्वीकारले व तिच्या कार्यास सुरुवात केली. या संस्थेमार्फत्त देवदासींच्या पुनर्वसनाबरोबरच त्यांच्या मुलांचे शिक्षण व लहान बालकांसाठी पाळणाघरे सुरु करण्यात आली. सावली संस्थेमार्फत जटा निर्मूलनही मोठया प्रमाणात केले जाते.[११] जटा म्हणजे देवदासी होण्याची पूर्वचिन्हे मानली जातात. म्हणूनच सावली संस्थेने जटा निर्मूलनास प्राधान्य दिलेले दिसते. या संस्थेच्या अध्यक्षा सुशिला नाईक यांनाही जटा होत्या. त्यांनी जटानिर्मूलनाची सुरवात स्वत: पासून केली. जट ठेवण्यामागे कशी धार्मिक अंधश्रध्दा असते हे त्यांनी सर्व जटाधारी देवदासी स्त्रियांना पटवून सांगितले. एका वर्षात ५०० मुले-मुली व महिलांच्या जटा कापण्यात सावली संस्थेला यश मिळाले. एकूणच संस्थेचा मुलींचे जटानिर्मूलन करुन, त्यांची लग्ने लावून, त्यांचे

पुनर्वसन करण्यामध्येही सिंहाचा वाटा आहे. याशिवाय या संस्थेतर्फे 'मी बाई आहे' या नावाने पथनाटयही बसविण्यात आले. ते गावोगावी सादर केल्याचेही दिसून येते. [१२]

मुलींचे जटानिर्मूलन करुन, त्यांची लग्ने लावून, त्यांना सन्मार्गाला लावण्याचे काम यशस्वीरितीने सावली संस्थेने पार पाडले व पार पाडत आहे. कारण अजूनही एखादया मुलीला जट धरली की समाजातील इतर मंडळी तिच्या पालकांना त्या मुलींना देवदासी सोडण्यास सांगतात. एकंदरीत जट या सगळया अनर्थाचे मूळ आहे. जट येणारी प्रत्येक बाई देवदासी बनत नाही. पण अंधश्रध्देच्या घातक निसरडया रस्त्यावर ती एक पाऊल नक्कीच टाकते. नंतर तोल केव्हाही जाण्याचा धोका कायम राहतो. [१३] त्यामुळे जटानिमूर्लन ही बाब आवश्यक बनलेली आहे. आज जटामुक्ती चळवळीने चांगलाच वेग घेतलेला आहे. २५ एप्रिल १९८५ ला अथणी येथे जटानिर्मूलनासाठी एक शिबीर भरविण्यात येऊन बऱ्याच देवदासींचे जटानिर्मूलन करण्यात आले. [१४] तसेच २९ नोव्हें., २००३ मध्ये गडहिंग्लज येथे झालेल्या मेळाव्यात आक्काताई यावडेकर व पारुबाई शिंदे (जरळी), रत्नाबाई (हलकर्णी) या ३ देवदासींचे जटानिर्मूलन करण्यात आले. [१५] तर आजमितीला संपूर्ण कोल्हापूर जिल्हा, गडहिंग्लज, भुदरगड, चंदगड इ. भागामध्ये जवळजवळ ११०० देवदासींचे जटानिर्मूलन करण्यात आल्याची माहिती मिळते. [१६]

## कर्नाटकातील पोलीस अधिकाऱ्यांच्या कामगिऱ्या

### १) कर्नाटकातील एस.पी. श्री. रमेश यांचे देवदासी बाबतचे कार्य -

प्रबोधन आणि जटानिर्मूलनाबरोबरच देवदासींचे विवाह घडवून आणण्यावरही अलिकडच्या काळात भर देण्यात आला होता. देवदासीला एकदा मुले, पती व संसाराची गोडी लागली तर त्या अनिष्ट प्रथेतून बाहेर पडतील व एक संसारीक स्त्री म्हणून समाजात मान, प्रतिष्ठा मिळेल जी आधी त्यांना देवदासी असताना कधीच मिळाली नाही.हा हेतू डोळयासमोरच ठेवूनच देवदासींच्या विवाहाबाबत कौतुक वाटावे अशी कामगिरी कर्नाटकातील एस.पी. श्री. रमेश यांनी केली.

श्री. रमेश यांनी २२ जानेवारी १९८४ रोजी महालिंगपूर येथे एकाच मांडवात एकाचवेळी ५७ देवदासींची लग्ने लावली. विवाह करुन घेणाऱ्या सर्व देवदासी तरुण नव्हत्या. काहींना मुले होती, काहींनी वयाची पन्नाशी ओलांडलेली होती. प्रथम श्री. रमेश यांनी महालिंगपूर भागातील पोलीस यंत्रणेमार्फत देवदासींची गणती केली. त्यांचे संबंध कोणत्या पुरुषांशी आहेत याचा शोध घेऊन त्या पुरुषांचे व देवदासींचे

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

प्रबोधन करुन त्यांना लग्न करुन घेण्यास प्रवृत्त केले व सर्व देवदासींना शासकीय मदत मिळवून दिली. या लग्न समारंभाच्यावेळी आपण आपली मुले देवीला वाहणार नाही, जोगवा मागणार नाही, अशी सामुदायिक शपथ देवदासींनी घेऊन विवाहीत व संसारीक स्त्री म्हणून त्यांनी आपल्या आयुष्यातील एका नव्या पर्वास प्रारंभ केला. [१७] अशाप्रकारे सामाजिक जाणीव ठेवून शासकीय सेवेत असलेल्या एका तरुण पोलीस अधिकाऱ्याने चाकोरी बाहेर जाऊन हे काम केले व इतर अधिकाऱ्यांना एक नवा आदर्श घालून दिला.

**२) कर्नाटकातील एस.पी. श्री. सुभाष भरणी यांचे देवदासीबाबतचे कार्य -**

दलित समाजातील एक वरिष्ठ पोलीस अधिकारी एस.पी.श्री. सुभाष भरणी यांनी १९८६ मध्ये बेल्लारी जिल्हयातील कंपली येथे २८ एप्रिल ११ मे या काळात एकाच वेळी १०१ देवदासींची लग्ने लावण्याचा उच्चांक गाठला होता असे दिसते.[१८] पुढे तर श्री.सुभाष भरणी यांनी कायदयाची अंमलबजावणी करुन ओकळी व सिटीआडू या प्रथा बंद पाडल्या. तेव्हा या प्रथेच्या संबंधित असलेल्या पुढाऱ्यांनी त्या भागाच्या खासदार बसवराजेश्वरी यांच्याकडे तक्रार केली. तेव्हा बसवराजेश्वरी यांनी श्री. भरणी यांची बदली करण्याची धमकी देऊन त्यांना लोकांच्या धार्मिक उत्सवात हस्तक्षेप न करण्याचा सल्ला दिला. पण श्री. सुभाष भरणी यांनी त्या धमकीला भीक न घालता देवाधर्माच्या नावावर जे घडते आहे ते अनैतिक आणि बेकायदेशीर आहे. ते प्रकार बंद व्हावेत म्हणून मी फक्त कायदयाची अंमलबजावणी व माझे कर्तव्य करीत आहे. असे सांगितल्यावर खासदार बसवराजेश्वरी यांनी श्री. सुभाष भरणी यांची बदली रेल्वे खात्यात करायला लावली.[१९] खरेतर खासदार बसवराजेश्वरी यांनी श्री. सुभाष भरणी यांची रेल्वेखात्यात बदली करुन ही प्रथा निर्मूलन करण्याच्या प्रयत्नाला विरोध केल्याचे दिसून येते. पण तरीही श्री. सुभाष भरणी यांनी देवदासींची लग्ने लावून उल्लेखनीय कामगिरी केली होती असेच म्हणावे लागते.

**३) कर्नाटकातील सी.पी.आय. श्री. एस. एस. रोण्णद यांचे देवदासींबाबतचे कार्य -**

१९९१-१९९२ या वर्षातही सुमारे ५० च्या आसपास मुलींना सौंदत्तीला देवदासी सोडण्यात आले होते. त्यापैकी १६ मुलींना पकडण्यात आले. त्यावेळी कर्नाटकातील सौंदत्तीचे सर्कल इन्स्पेक्टर श्री. एस.एस. रोण्णद यांनी माघी पौर्णिमेला काकणे फोडून गेलेल्या आणि यात्रेला देवाबरोबर लग्न करण्यासाठी आलेल्या ११ मुलींची त्यांच्याबरोबर आलेल्या तरुणांशी लग्ने लावून दिली. त्यापैकी पाच मुली पूर्वी

सोडलेल्या देवदासी होत्या.[२०] यापूर्वीही श्री. एस.एस. रोण्णद यांनी बऱ्याच देवदासींची तेथील तरुणांबरोबर लग्ने लावून देऊन इतर अधिकाऱ्यांना एक नवीन आदर्श घालून दिला होता असे दिसते.[२१]

## १९८४ मधील प्रबोधन शिबीराचे कार्य

१९८४ मध्ये महाराष्ट्र व कर्नाटकातील देवदासी मुक्ती चळवळीतील कार्यकर्त्यांचे एक प्रबोधन शिबीर सौंदत्ती येथे झाले. त्या शिबीराला डॉ. बाबा आढाव, डॉ. अनिल अवचट, डॉ. नरेंद्र दाभोळकर, प्रा.विठ्ठल बन्ने, प्रा.डॉ. अच्युत माने, प्रा.डॉ.एन.डी.जत्राटकर, डॉ.भीमराव गस्ती, प्रा.सुभाष जोशी, वसंत राजस, छाया दातार, गौराबाई सलवादे, चंद्राबाई बारामतीकर, सुशिला नाईक (या ३ देवदासी आहेत) इ. कार्यकर्ते उपस्थित होते. त्यावेळी यल्लम्माची जत्रा होती. त्या निमित्ताने देवदासींचा एक मोर्चा काढण्यात आला. तो मोर्चा विसर्जित झाल्यानंतर तेथे जाहीर सभा झाली. त्या सभेमध्ये ''देवाच्या नावावर मुलींना देवदासी सोडणे बंद करावे, चंद्रगुत्ती येथे चालणाऱ्या नग्नपूजेवर कर्नाटक सरकारने कायदयाने बंदी घालावी. देवदासींचे पुनर्वसन करावे असे ठराव पास करण्यात आले. सौंदत्तीला यल्लम्माच्या जत्रेच्या वेळी देवदासींचा मोर्चा काढून लोकांचे लक्ष देवदासी समस्यांकडे वेधण्यात आले. या कार्यक्रमांमधून इतर देवदासींमध्ये व लोकांत जागृती झाली.[२२]

अशाप्रकारे कार्यकर्त्यांनी या शिबीराच्यावेळी देवदासींचा मोर्चा काढून, ठराव पास करुन ते शासनाने अंमलात आणावेत. अशी सक्ती शासनावर करुन देवदासी पुनर्वसनाचे कार्य केल्याचे दिसून येते.

## १९८४ ते १९८८ मधील कर्नाटक व महाराष्ट्रातील देवदासी सुधार कार्यक्रम

महाराष्ट्र व कर्नाटकात देवदासी प्रथेविरुध्द बरेच सुधार कार्यक्रम करण्यात आले. १९८४ या वर्षी केलेल्या सर्वेक्षणानुसार कर्नाटकात ८,८७० देवदासी होत्या. भारतीय आरोग्य संघटनेनुसार २००० देवदासी प्रत्येक वर्षी तयार होतात. १९९० या एकाच वर्षी ३,००० मुली देवीला वाहण्यात आल्या. त्यामध्ये ४ ते २० पर्यंतच्या वयोगटातील मुली होत्या. बेळगाव विभागाच्या सर्व्हेत २,५६० देवदासी कुटुंब धारवाड, कुंदगोळ, हुबळी, गदग या परिसरात असल्याचे दिसून येते. धारवाड जिल्हयात ३,५७३ देवदासी कुटुंबे आहेत. त्यांना १,५७४ मुली आहेत. ज्यांची वये १८ वर्षाच्या आत आहेत. विजापूर जिल्हयात ४,६०० देवदासी असून त्यात ३,७६८ या मुली आहेत. मरिअम्मनहळ्ळी येथे ६०% देवदासी

असल्याचा उल्लेख आढळतो. शहापेन, यादगिरी, अथणी, चिकोडी, हुक्केरी, रामदुर्ग, गोकाक, रायबाग या जिल्हयांचे सर्वेक्षण अतिशय मंदगतीने होत आहे. [२३]

वरील सर्वेक्षणात बेळगाव जिल्हयात २५६० देवदासी असल्याचा उल्लेख आढळत असला तरी १९८८ मध्ये बेळगाव जिल्हयातील देवदासींचा सविस्तर अभ्यास निपाणीचे डॉ.एन.डी.जत्राटकर यांनी केला आहे. त्यामध्ये त्यांना बेळगाव जिल्हयाच्या १० तालुक्याच्या ११८८ खेड्यांमध्ये वास्तव करणाऱ्या ८३६ देवदासी व अथणी, चिकोडी या तालुक्यामध्ये सर्वाधिक देवदासी असल्याचे आढळून आले. एवढेच नव्हे तर झुलवा लावलेल्या, रखेल म्हणून राहणाऱ्या आणि नियमित वेश्यावृत्ती करणाऱ्यांचीही संख्या याच तालुक्यामध्ये अधिक असल्याचे त्यांचे निरीक्षण आहे. [२४]

देवदासीची प्रथा केवळ कर्नाटकात होती असे नाही तर महाराष्ट्र व कर्नाटकाच्या सीमा भागात ही प्रथा जास्त प्रमाणात आढळते. प्रामुख्याने गडहिंग्लज, गारगोटी, सांगली, जत, कोल्हापूर, आजरा, मुरगूड, सातारा, पुणे, मुंबई इ. ठिकाणी देवदासींची परिस्थिती कशी होती व ही प्रथा मोडण्याचे प्रयत्न स्वातंत्र्योत्तर काळात कसे केले गेले याच आढावा घेणे महत्वाचे आहे.

१) <u>**गडहिंग्लज**</u> - गडहिंग्लज येथे १९८६ मध्ये देवदासी निराधर मुक्ती केंद्र स्थापन झाले असून त्यांच्या मार्फत देवदासींच्या मुलांमुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह चालविण्यात येत आहे. या वसतिगृहाचा लाभ देवदासींची १०० हून अधिक मुले- मुली घेत आहेत. पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाच्यावतीने देवदासींना स्वावलंबी बनविण्यासाठी लोकर उद्योग, रेशीम उद्योग, रोपवाटिका, अगरबत्त्या तयार करणे इ. प्रशिक्षण दिले जाते. छत्रपती शिवाजी महाविद्यालयांमार्फत देवदासींचे जटा निर्मूलनही केले जाते. आतापर्यंत गडहिंग्लजमध्ये ४० देवदासींची लग्ने लावण्यात आली आहेत. [२५]

२) <u>**गारगोटी**</u> - गारगोटीमध्ये १९८२ सालापासून अंधश्रध्दा व देवदासी मुक्ती केंद्राच्या वतीने जट निर्मूलनाचे आणि अंधश्रध्दा निराकरणाचे कार्य चालते. आतापर्यंत १२०० च्या वर देवदासींच्या मुलांमुलींच्या जटा सोडविण्यात आलेल्या आहेत. काही मुलींची देवाशी होत असलेली लग्ने ही थोपविण्यात आलेली आहेत. याशिवाय गारगोटीमध्ये १०० देवदासीने स्वत:हून दर्शन व परडी त्याग केलेला आहे. आतापर्यंत १४ देवदासींचा कायदेशीर विवाह घडवून आणण्यात आला आहे.

गारगोटी येथील त्यावेळचे उद्योग राज्यमंत्री मा.कल्लाप्पा आवाडे यांच्या अध्यक्षतेखाली देवदासी पुनर्वसन मेळावा घेण्यात येऊन बऱ्याच देवदासींचे पुनर्वसनही करण्यात आलेले आहे. [२६]

३) **सांगली** - सतशील व मच्छिल देवदासी पुनर्वसन मंडळाच्यावतीने १९८५ पासून २५ देवदासीची लग्ने लावण्यात आली व त्यांच्या जटा सोडविण्यात आल्या. याशिवाय ३५० देवदासींना शिधापत्रिका व लघु उद्योगासाठी (भाजीपाला, शेळया, मेंढया, कोंबडया, दूध डेअरी, पानठेला, चहाची गाडी, भांडी) इत्यादीसाठी प्रत्येकी रु. ५ ते ७००० पर्यंत कर्जे राष्ट्रीयकृत बँकेकडून मिळवून दिली आहेत. याखेरीज सांगलीमध्ये मुरळयांसाठीही तशीच तरतूद केलेली आहे. आज तेथे 'जय गंगातारा कलाकार संघटना' यांच्यावतीने मुरळयांच्या पुनर्वसन व त्यांना शासनाकडून पेन्शन मिळवून देण्याचे कार्य केले जाते. [२७]

४) **जत** - महाराष्ट्राच्या सांगली जिल्हयाच्या तत्कालीन जिल्हाधिकारी सौ. लीना मेंहदळे यांनी जत या ठिकाणी देवदासी पुनर्वसनाचे केंद्र सुरु केले होते. पण देवदासींना पुरेशा पगार कामधंदा उपलब्ध नसल्याने ते मोडकळीस आले आहे. सध्या जतमध्ये भगिणी निवेदिता प्रतिष्ठान संचलित देवदासी प्रशिक्षण केंद्र, जत जिल्हा सांगली यांच्यामार्फत ७५ ते ९० देवदासींच्या मुलांसाठी वसतिगृह चालविण्यात येत आहे. याशिवाय त्याठिकाणी विविध प्रकारच्या उद्योगधंदयाचे प्रशिक्षण दिले जाते. तसेच त्यांच्या शालेय प्रशिक्षणाकडेही लक्ष दिले जाते. या संस्थेला शासकीय अनुदानही मिळत असल्याची माहिती मिळते. [२८]

५) **कोल्हापूर** - कोल्हापूरांमध्ये विविध शिक्षण संस्था आणि जिल्हा परिषदांतर्फे जटा सोडविण्याचा कार्यक्रम व्यापक प्रमाणात पार पडला. डॉ.कीर्तिकुमार अरगडे यांनी वैयक्तिक पातळीवर अनेक देवदासींच्या जटा सोडविल्या. शिवाजी विद्यापीठाच्या बहि:शाल शिक्षण या विभागाने खेडयांपाड्यांत जाऊन देवदासी प्रथेविरुध्द प्रबोधन केले. जिल्हा प्रौढ शिक्षण विभागातर्फे देवदासींचे मेळावे व जटा सोडविण्याचा कार्यक्रम झाला. याशिवाय प्राथमिक शिक्षक संघटना व महिला फेडरेशन लेडी लायन ऑक्झीलरीज इ . संघटनांनीही जटा सोडविण्याच्या मोहिमेत भाग घेतला. देवदासींच्या समस्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठात आजही एम.फील आणि पी.एचडी. प्रबंधासाठी या समस्येतील विविध विषय देऊन संशोधन करण्यात आल्याचे

दिसून येते. तसेच वेश्यांमध्ये देवदासींचे प्रमाण किती आहे हे शोधून काढण्यासाठी प्रा.श्रीमती साधना झाडबुके यांच्या मार्गदर्शनाखाली एक सर्वेक्षण कोल्हापूरात करण्यात आले. आजही त्या या क्षेत्रात आघाडीने काम करीत आहेत.[२९] कोल्हापूर देवदासी संघटनेचे कार्यकर्ते अशोक भंडारी हे वेळोवेळी देवदासीचे मोर्चे काढून, मेळावे भरवून त्या स्त्रियांमध्ये जागृती निर्माण करीत आहेत.

६. <u>आजरा</u> - आजरा येथील दलित मानवी संरक्षक संघटना व देवदासी मुक्ती संघ, आजरा या संस्थेमार्फत देवदासींची लग्ने लावणे, समाजामध्ये लोकमत जागृत करणे, जटा सोडविणे ही कामे चालतात. 'दलित मानवी संरक्षक संघटनेच्या' वतीने आजही देवदासींच्या पुनर्वसनाचे कार्य चालते. शिवाय मुरगुड येथेही शिवराज हायस्कूल आणि श्रीयुत बाईत यांच्यामार्गदर्शनाखाली अनेक देवदासींच्या जटा सोडविण्याचा कार्यक्रम पार पाडल्याची व त्यांच्यामार्फतच देवदासींचे विवाहही घडवून आणल्याची माहिती मिळते.[३०]

७. <u>सातारा</u> - सातारा येथील अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या वतीने जटा निर्मूलनाचे कार्य सातत्याने चालते. आतापर्यंत २०० पेक्षा जास्त देवदासींच्या, मुरळयांच्या जटा सोडविण्यात आल्या आहेत. या समितीच्या वतीने लोकांमध्ये जागृती करण्यासाठी पथनाट्येही सादर केली आहेत. याशिवाय सातारा जिल्हयामध्ये पाली येथील जय मल्हार वाघ्यामुरळी संघटनेच्यावतीने आजही मुरळ्यांच्या पुनर्वसनाचे कार्य केले जाते. त्या मुरळ्यांना शासनाकडून पेन्शन मिळवून देण्याचे कामही ही संघटना करीत आहे.[३१]

८. <u>पुणे</u> - पुण्यामध्ये सर्वश्री विलास वाघ, विजयाबाई लवाटे, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट यांच्या वतीने देवदासींच्या मुलामुलींच्यासाठी वसतिगृहाची व शिक्षणाची सोय केली जाते. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्टच्या वतीने देवदासींच्या घरासाठी पुणे-सिंहगड रस्त्यावर एक वसाहतही निर्माण केली आहे. याशिवाय 'अखिल भारतीय देवदासी संस्था', पुणे यांच्या वतीने आजही देवदासींचे पुनर्वसन,जटानिर्मूलन,शासकीय मदत इ. कार्यक्रम चालविले जातात. या संस्थेतून देवदासींच्या मुलामुलींना व्यवसायिक व शालेय शिक्षण दिले जाते.[३२]

९. <u>भुदरगड, चंदगड</u> - भुदरगड मध्ये १२७० तर चंदगड तालुक्यात ३०० देवदासी अस्तित्वात आहेत. त्यापैकी जवळजवळ १००० पेक्षा जास्त देवदासींचे जटानिर्मूलन झाले आहे. याशिवाय

त्यांचे पुनर्वसन करुन त्यांना शासनाची मदत मिळवून देण्याचे काम ' देवदासी मुक्ती संघटना भुदरगड' या संस्थेच्यावतीने केले जाते.[३३]

१०. **मुंबई** - मुंबई येथे महात्मा फुले समता प्रतिष्ठानाच्या वतीने कामाठीपुरा येथे देवदासींच्या मुलांसाठी रात्रीची शाळा चालविली जाते. यामध्ये साधारणत: १५० मुलांची सोय करण्यात आली आहे. याच केंद्राच्या वतीनेच देवदासींच्या मुलामुलींना राज्यातील इतर वसतिगृहांमध्ये प्रवेश मिळवून दिला जातो. 'निर्मला निकेतन' या संस्थेच्या वतीने असे स्वरुपाचे कार्य चालते. 'World Health organization' या संस्थेच्या वतीनेही याठिकाणी काम चालते. याशिवाय 'देवदासी महिला विकास केंद्र' या संस्थेच्या वतीने देवदासींचे पुनर्वसन, जटानिर्मूलन करुन त्यांचे विवाह घडवून आणले जातात.[३४]

अशाप्रकारे वरील भागांमध्ये आजही विविध संस्था कार्य करीत असल्याचे दिसून येतात. त्यांच्या सहकार्यामुळेच देवदासी स्त्रिया नव्याने जीवन जगण्यासाठी मोठ्या उत्साहाने पुढे आल्या. त्यांनी आपल्या जटा कापून टाकल्या व स्वत:मध्ये आत्मविश्वास निर्माण केला. या आत्मविश्वासाच्या जोरांवरच त्या स्वत:चे पुनर्वसन करताना दिसून येतात. एकूणच वरील ठिकाणापैकी मुंबई येथे देवदासींचे प्रमाण जास्त आहे. आजही मुंबईतील कामाठीपुरा, देवनार, मदनपुरा, परळ यासारख्या रेडलाईट भागांमध्ये जवळजवळ ९०% देवदासी वेश्या व्यवसाय करीत असताना दिसत आहे. लहानपणी देवाला वाहिल्यामुळे, समाजाकडून होणाऱ्या जाचाकडून, झुलवा लावून घेतलेल्या व्यक्तीने सोडून दिल्यामुळे, त्यांच्या जीवनाची पखडच सुरु होते. मग त्या उदरनिर्वाहासाठी मुंबईतल्या धगधगत्या माड्याचा आश्रय घेताना दिसून येतात. म्हणूनच त्यांच्याही पुनर्वसनाचे काम कामाठीपुरा येथे महात्मा फुले समता प्रतिष्ठानाच्या वतीने आजही केले जाते.

## १९८६ ते १९९० मधील देवदासी पुनर्वसनाचे कार्य

१९८६ साली शासनाचे देवदासी पुनर्वसनाकडे लक्ष वेधण्यासाठी प्रा. विठ्ठल बन्ने, श्री.शंकरराव मेंडुले इ. कार्यकर्ते व श्रीमती चंदा बारामतीकर, लक्ष्मी, सोना इ. ११ देवदासी यांनी प्राणांतिक उपोषण सुरु केले होते. शासनाच्या हस्तक्षेपाने पाच दिवसानंतर उपोषण मागे घेण्यात आले. शासनाकडून गडहिंग्लज व जत येथे लगेच देवदासी मुलांमुलींसाठी वसतिगृह, ट्रेनिंग सेंटर, उद्योग केंद्र सुरु करण्यात आले.

देवदासींच्या मानवी विवाहाला उत्तेजन देण्यासाठी शासनाने प्रत्येकी दहा हजार रुपयांचे अनुदान सुरु केले. पण त्यानंतर कायदा पुनर्वसनाचे कार्य दुर्लक्षीत राहीले. विधान सभेवर ''चौंडक मोर्चा'' जाहीर केल्यावर मुख्यमंत्री ना. शरद पवार यांनी लगेच चळवळीच्या कार्यकर्त्यांना बोलावून घेतले. मा. श्री. बाबासो कुपेकर व मा. आमदार सदाशिवराव मंडलिक यांच्या समवेत प्रा. विठ्ठल बन्ने, डॉ. अच्युत माने, डॉ. आनंद वास्कर, श्रीमती गौराबाई सलवादे यांचे एक शिष्टमंडळ मुख्यामंत्र्यांना भेटले. माजी समाजकल्याणमंत्री मा. सुधाकरराव नाईक यांनी उपाय योजना करण्यासाठी दोन दिवस चळवळीचे नेते, समाजसेवक, आमदार, पालकमंत्री इ. संयुक्त बैठक घेतली व त्यावर योग्य विचार करुन देवदासी कल्याण अभ्यास गटाची १ जानेवारी, १९९० रोजी नियुक्ती जाहीर केली. या कमिटीच्या अध्यक्षपदी माजी मंत्री मा. प्रकाश आवाडे यांची नेमणूक करण्यात आली. थोडयाच काळात अभ्यास गटाने देवदासींचे मनोगत समजून घेण्यासाठी समाजकल्याण खात्याच्या सहकार्याने विविध ठिकाणी मेळावे घेतले. संघटनेच्या भेटी घेतल्या, निवेदने स्विकारली व शेवटी समस्यांची तीव्रता लक्षात घेऊन या गटाने आपला अंतरिम अहवाल तयार करुन तो ३० जून, १९९० रोजी मा. मुख्यमंत्री व मा. समाजकल्याण मंत्री यांना सादर केला.[३५]

हा अहवाल शासनाला सादर करण्यापूर्वी अभ्यास गटाने निरनिराळया भागाला भेटी देऊन सर्व्हे केला. त्यावेळी त्यांच्या निदर्शनास जी काही परिस्थिती आली त्याबाबतची त्यांची निरीक्षणे पुढील प्रमाणे आहेत -

१. देवदासी प्रथेत बळी पडलेल्यांत गरीब व दलितांचे प्रमाण प्रचंड आहे.

२. नवस, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा, जट येणे, आजार, गरिबी, फसवणूक इ. कारणामुळे अल्पवयीन मुलामुलींना देवाला वाहिले जाते.

३. यात बळी पडलेल्या सर्वच देवदासी वेश्या व्यवसाय करीत नाहीत. परंतु वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांमध्ये देवदासींचे प्रमाण मोठे आहे. काही देवदासी अनैतिक मार्गाचा अवलंब करुन जीवन कंठत असतात.

४. देवदासी प्रथेचे निर्मूलन करण्यासाठी सीमा भागात कर्नाटक शासनाबरोबर समन्वय साधून उपाययोजना करणे गरजेचे आहे.

५. या प्रथेचा सखोल अभ्यास करण्याचे काम हे राज्यातील टाटा सामाजिक विज्ञान संस्था मुंबई, महात्मा फुले प्रतिष्ठान पुणे, कर्वे समाज संस्था पुणे, छ. शाहू इन्सिटटयूट कोल्हापूर, महाराष्ट्र राज्य देवदासी मुक्ती संघटना गडहिंग्लज, प्रौढ व निरंतर शिक्षण विभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अशा सर्व संस्थेकडे सुपूर्त करण्यात यावे.

६. बहुसंख्य देवदासींना या प्रथेतून मुक्त होण्याची तीव्र इच्छा आहे. आपल्यावर आलेला प्रसंग आपल्या मुलां-मुलींवर येऊ नये यासाठी त्यांची धडपड चाललेली आहे. मात्र त्यांच्या जागृतीच्या प्रमाणात उपाय योजनांचा अभाव कटाक्षाने जाणवतो.

७. देवदासी प्रथा निर्मूलनाच्या व पुनर्वसनाच्या बाबतीत राष्ट्रीय स्वरुपाच्या कायदयाची गरज आहे. याबाबतीत महाराष्ट्राचा नवा कायदा आदर्शभूत ठरेल असा विश्वास अभ्यासगटाला होता असे दिसते.[३६]

## ३० जून १९९० मधील देवदासी कल्याण अभ्यास गटाचा अहवाल

देवदासी प्रथा बंद करण्यासाठी शासन आणि जनता अशा स्तरावर विविध मार्गी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जेव्हा कधी ही प्रथा बंद होईल त्यापूर्वी बळी पडलेल्या देवदासी, त्यांची मुले, जोगते इ. चा ही प्रश्न सोडविणे महत्वाचे आहे. हे लक्षात घेऊन अभ्यास गटाने प्रतिबंध, पुनर्वसन, प्रबोधन, संशोधन अशा विविध स्वरुपावर उपाय सुचविलेले आहेत ते असे -

**अ) निर्मूलन** -

१. त्यासाठी नवा व्यापक कायदा करण्यात यावा.

२. देवदासी प्रोटेक्शन ॲक्ट १९३४, बालन्याय अधिनियम १९८६, पोलीसी कायदा यांचा उपयोग करुन नव्याने मुलगा / मुलगी सोडण्याला अपराध समजून दंड शिक्षेचा अंमल करण्यात यावा.

३. विविध माध्यमाचा वापर करुन, प्रचार, प्रबोधन घडविण्यात यावे.

४. सामाजिक संस्था, व्यक्ती यांच्या कार्यासाठी अनुदान देऊन प्रोत्साहित करावे.

५. समाजाचा दृष्टिकोन बदलण्याची गरज लक्षात घ्यावी.

**ब) पुनर्वसन** -

देवदासी प्रथेचे निर्मूलन करताना त्या मोहिमेला विकसनशील जोड देण्याची नितांत गरज आहे याकडे अभ्यास गटाने शासनाचे लक्ष वेधले आहे. कायदयाने आणि डोळस प्रयत्नाने ही रुढी कायमची

उखडली जाईल. पण या आधी ज्या देवदासी ठरल्या त्यात त्यांचा काय दोष ? समाजानेच आपल्या चालीरितीतून त्यांचा बळी घेतला आहे ? त्यांचे व त्यांच्या मुलांबाळांचे सार्वत्रिक पुनर्वसन करणे हे सामाजिक न्यायाच्या व माणुसकीच्या दृष्टिने योग्य आहे. अभ्यास गटाने १ ते १८, १८ ते ४०, ४० ते पुढे अशा वयोगटानुसार पुढील शिफारशी सुचविल्या आहेत.

१. महिला व बालकल्याण कामासाठी स्वतंत्र संचनालय स्थापन करण्यात यावे.

२. कोल्हापूर येथे देवदासी कल्याण कामासाठी स्वतंत्र कक्षा अंतर्गत मुख्य कार्यालय सुरु करण्यात यावे.

३. प्रत्येक जिल्हयात जरुरीप्रमाणे एक प्रकल्प अधिकारी नियुक्त करण्यात यावा.

४. ४० वर्षाच्या व पुढील प्रत्येक देवदासीला दरमहा ३००/- रु. पेन्शन सुरु करण्यात यावी.

५. वृध्दाश्रमाची सोय उपलब्ध करुन देण्यात यावी.

६. १८ ते ४० वयोगटातील देवदासींना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात यावे.

७. प्रशिक्षणासाठी राज्यात १० प्रशिक्षण केंद्रे उभी करावीत.

८. प्रशिक्षणार्थींना मासिक ३००/- रु. विद्यावेतन,एस.टी. प्रवासाचे मोफत पास, निवासाची सोय करण्यात यावी.

९. स्वयंरोजगार व्यवसायासाठी बीज भांडवल, जागा, गाळे यांची व्यवस्था करण्यात यावी.

१०. ६ ते १८ वयोगटातील मुलांमुलींना सर्वच प्रकारचे प्राथमिक - माध्यमिक - उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण इ.सर्व प्रकारच्या शिक्षणाची मोफत व्यवस्था व्हावी.

११. शिक्षीत देवदासी, त्यांची मुले यांच्यासाठी शासकीय, निमशासकीय संस्था, महामंडळे इ. ठिकाणी काही काळ २% जागा आरक्षित ठेवण्यात यावे.

१२. प्रत्येक जिल्हयात देवदासींच्या मुलांमुलींसाठी स्वतंत्र असे एक वसतिगृह सुरु करण्यात यावे.

१३. १ ते ६ वर्षे वयोगटातील मुलांमुलींना सकस आहार, पाळणाघर, अंगणवाडया, बालवाडया, संस्कार केंद्रे, आरोग्य विषयक सुविधा यांची तरतूद करण्यात यावी.

१४. महाराष्ट्रातील १० जिल्हयात ५००० घरकुले उभी करण्यात यावीत.

१५. देवदासी प्रथा निर्मूलन करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना पुरेशे अनुदान देण्यात यावे.

१६. अंधश्रध्दा, अनिष्ट प्रथा, निरर्थक चाली याविरुध्द स्वयंम प्रेरणेचे काम करणाऱ्या संस्था यांना प्रोत्साहन देण्यात यावे.

१७. विविध प्रचार व प्रसार माध्यमाचा ही प्रभावी वापर करण्यात यावा.

१८. निर्मूलन, पुनर्वसन, प्रबोधन ही उद्दिष्टे असतील असा नवा कायदा करण्यात यावा.

१९. कर्नाटक - महाराष्ट्र असा एक संयुक्त कार्यक्रम अंमलात आणण्यात यावा.

२०. देवदासींनी ही प्रथा फेकून देऊन, लग्न करुन सन्मानीत जीवन व्यतित करण्याचे ठरविल्यास तिला उत्तेजन म्हणून रु. १०,०००/- ची मदत देते.

याबाबतचा नियम, पध्दती, अटी यात सुधारणा सुचविल्या आहे. विविध राज्यातील कायदे, सुधारणा कायदा व पोलीस खात्याच्या सूचना यांचा अभ्यास करुन अभ्यास गटाने " The Devadasi System Abolition Act And Rehabilitation Act 1990 " या शिर्षकाखाली कायदयाचा एक मसुदाही जोडला आहे. [३७]

## २६ जानेवारी १९९० चा देवदासी प्रथा, निर्मूलन आणि पुनर्वसन कायदा

हा कायदा देवीदेवतांना मुलेमुली, स्त्रिया-पुरुष वाहण्यात येणारी प्रथा बंद करणे, अशाप्रकारे वाहण्यात आलेल्या व्यक्तींना स्वतःच्या फायदयाकरिता उपयोगात आणले जाते. त्यापासून सदर व्यक्तीचे संरक्षण करणे व त्या व्यक्तीचे पुनर्वसन करणे. या उद्देशाने महाराष्ट्र राज्यात अंमलात येत आहे. देवीदेवतांना एखाद्या धार्मिक स्थळांना आणि मठांना व्यक्ती वाहण्याची प्रथा महाराष्ट्र राज्याच्या काही भागांमध्ये प्रचलित आहे. परंतु त्यामधून काही व्यक्ती स्वतःच्या स्वार्थासाठी त्यांना वापरतात व त्याव्दारे एड्ससारख्या व्याधी वाढत आहेत. त्यांचे निर्मूलन करणे अशा व्यवस्थेमध्ये ज्यांचे हितसंबंध गुंतले आहेत, त्यांना अटकाव करणे आणि पीडित व्यक्तीचे तसेच समाजाचे अशा घातक रोगापासून संरक्षण करणे हा हेतू या कायद्यामागे आहे. (महाराष्ट्र राज्य विधान सभेमध्ये भारतीय प्रजासत्ताकाच्या ४० व्या वर्षी खालीलप्रमाणे कायदा पास करण्यात आला.)

## प्रास्ताविक- नाव व्यक्ती आणि कालावधी

१. देवदासी प्रथा निर्मूलन आणि पुनर्वसन हा १९९० चा कायदा या नावाने ओळखण्यात येईल.

२. कोर्ट म्हणजे भाग ४ अन्वये करण्यात येणारी चौकशी.

६. जिल्हा समिती म्हणजे सरकारतर्फे नेमण्यात येणारी समिती.

७. अधिकृत व्यक्ती म्हणजे जिल्हा समितीतर्फे त्यांच्यावतीने नेमण्यात येणारी व्यक्ती.

## नियंत्रण मंडळ

हे मंडळ सरकारकडून स्थापन करण्यात येईल व त्यामध्ये न्यायदंडाधिकारी व त्याचा मदतनीस म्हणून दोन जबाबदार समाजसेवक जे राज्याच्या सुप्रीम कोर्टाकडून जिल्हया समितीच्या सल्लयानुसार नेमले जातील. जिल्हा समितीवर जिल्हा न्यायाधिश अध्यक्ष असतील व जिल्हाधिकारी, जिल्हा पोलीस प्रमुख, जिल्हा परिषदचे मुख्य अधिकारी इ. सभासद असतील.

## नियंत्रण मंडळाचे अधिकार

देवदासींच्या रक्षणासाठी त्यांचा गैरवापर होण्यापासून बचाव करणे आणि समाजाचे धोकादायक रोगापासून संरक्षण करण्यासाठी हे नियंत्रण मंडळ कोणताही योग्य हुकूम देऊ शकतो. त्या व्यक्तीचा ताबा घेणे,सांभाळ करणे,पुनर्वसन करणे इत्यादी जे योग्य वाटेल त्याप्रमाणे हे मंडळ हुकूम देऊ शकतो. त्यासाठी येणारा खचार्चा अंदाज करुन तो त्या संबंधित गुन्हेगारांकडून अंशत: किंवा संपूर्ण वसूल करणेचा आदेश देऊ शकतो. हे नियंत्रण मंडळ चांगल्या वर्तणुकीच्या बॉण्ड संबंधित गैरफायदा व त्यामध्ये भाग घेणाऱ्यांकडून घेऊ शकतो. हा बॉण्ड चौकशीच्या कोणत्याही वेळी घेता येतो आणि तो जास्तीत जास्त ५ वर्षे किंवा देवदासी व्यक्ती सज्ञान होईपर्यंतचा असू शकतो. कोणतेही न्यायालय या हुकुमास स्थगिती देऊ शकत नाही. याखेरीज हे मंडळ १९९० च्या कायदयानुसार गुन्ह्यामध्ये सामिल होणाऱ्या व्यक्तीस २ वर्षापर्यंत तडीपार करु शकते.

## देवदासी म्हणून अर्पण करणे कायदयाविरुध्द आहे

कोणत्याही प्रथेनुसार एखाद्या व्यक्तीच्या संमतीने किंवा संमतीशिवाय देवदासी म्हणून वाहणे किंवा अर्पण करणे हे या कायदयानुसार बेकायदेशीर मानण्यात येईल व अशा प्रकारचे अर्पण व कार्य व कायदा अस्तित्वात येण्याअगोदर अर्पिले असले तरीसुध्दा ते रद्दबादल ठरविण्यात येईल.

## अधिकृत व्यक्तीचे अधिकार

१. अधिकृत व्यक्तीस जर एखादी व्यक्ती गुन्हा करताना सापडली किंवा गुन्हा करण्यास मदत करत असल्याचा संशय आला तर अशा व्यक्तीस या कायदयांर्गत न्यायालयासमोर आणण्याचा अधिकार आहे.

५) देवदासीबरोबर केलेला कोणताही विवाह त्या व्यक्तीला दुसरी पत्नी असेल तर कायदेशीर मानला जाईल. कोणत्याही प्रकारचे शरीरसंबंध देवदासी बरोबरचे लग्न समजले जाईल. त्यासाठी लग्नाची नोंदणी नसली तरी चालेल.

१२) शिक्षा - जर कोणतीही व्यक्ती हा कायदा अस्तित्वात आल्यानंतर देवदासी म्हणून वाहण्याचा कोणताही समारंभ घडवून आणणे, त्यामध्ये भाग घेणे, त्यास संमती देणे इ. बाबत जर संशयीत असेल तर या कायदयाप्रमाणे जास्तीत जास्त ३ वर्षे तुरुंगवास व जास्तीत जास्त दोन हजार रुपये दंड होऊ शकतो. जर संशयीत व्यक्ती नातेवाईक, पालक किंवा जन्मदाते असतील तर जास्तीत जास्त ५ वर्षे तुरुंगवास व कमीत कमी २ वर्षे तुरुंगवास आणि जास्तीत जास्त पाच हजार रुपये दंड व कमीत कमी दोन हजार रुपये दंड होऊ शकतो.

**१६) जेथे ही देवदासी प्रथा असते तेथील देवस्थानाबाबतचे न्यायालयाचे अधिकार -**

१. ज्याठिकाणी देवदासी प्रथा चालू आहे. त्या ठिकाणी कायदयाचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास योग्य ती कारवाई न्यायालय करु शकते.

२. न्यायालयाच्या आदेशाविरुध्द उच्चन्यायालय अपील करण्याच्या कालावधीमध्ये कोणत्याही गोष्टीची प्रसिध्दी करता येणार नाही. त्या अवधीत जर अपील केले नाही तर नंतर केले जाणारे अपील हे आपोआपच रद्दबादल ठरते.

**१७) पोलीस अधिकाऱ्यांचे अधिकार -**

कोणतेही पोलीस अधिकारी, समाजकल्याण खात्याचा सेवक किंवा समाजसेवकास एखादी व्यक्ती देवदासी असल्याचा संशय आल्यास किंवा देवदासीचा गैरफायदा घेणारी व्यक्ती आढळल्यास अशा व्यक्तींला नियंत्रण मंडळाच्यासमोर आणण्याचा अधिकार आहे. या कामामध्ये पोलीस किंवा सरकारी नोकर किंवा समाजाच्या कोणत्याही घटकाने अधिकृत व्यक्तीस मदत केली पाहिजे.

**१९) नियम बनविण्याचे अधिकार -**

अ) या कायद्याप्रमाणे तपासणी करण्यासाठी.

ब) देवदासींचा ताबा, पालन, संरक्षण, त्यांचे कल्याण तसेच पुनर्वसन इ.साठी.

क) इतर कोणत्याही राज्य सरकारने सुचविलेल्या कारणांसाठी.

## २०) कायदा रद्द करणे आणि चालू ठेवणे

मुंबई देवदासी संरक्षण कायदा १९३४ (क्रमांक १०) आता रद्द करण्यात येत आहे. जर हा कायदा विधान सभेत मंजूर झाला तर वरील कायद्याप्रमाणे घेतलेले निर्णय रद्द ठरविले जातील.[३८]

अशाप्रकारे देवदासींच्या हिताचा विचार करणारा १९९० चा कायदा जरी पास होऊन आज देवदासी उघडपणे होण्याचे प्रमाण कमी झाले असले तरी ते छुप्या पध्दतीने चालूच आहे. तिचे समूळ उच्चाटन झालेले दिसत नाही.

## अभ्यास गटाच्या वतीने घेण्यात आलेले मेळावे १९९० ते १९९१

अभ्यास गटाच्या वतीने समाज कल्याण खात्यांमार्फत पुढील ठिकाणी मेळावे आयोजित करण्यात आले. देवदासी, सामाजिक कार्यकर्ते, पोलीस अधिकारी, विविध तज्ञ डॉक्टर्स, सामाजिक संस्था चालक यांचे मेळावे भरविण्यात आले. दि.१२/६/१९९० रोजी मेळाव्याचे उद्घाटन राज्याचे समाज कल्याणमंत्री रामदास आठवले यांनी केले. दुसरा मेळावा दिनांक १४/६/१९९० रोजी सोलापूर येथे झाला. तिसरा मेळावा दिनांक १७/६/१९९० रोजी पुणे येथील टिळक स्मारक मंदिरात झाला. तर चौथा मेळावा सांगली येथे दि. २६/६/१९९० रोजी झाला. तसेच कर्नाटक राज्यातील हुक्केरी तालुक्यातील दड्डी या गांवी दिनांक ३०/५/१९९१ रोजी झालेल्या परिषदेमध्ये अभ्यास गटाचे सदस्य डॉ.बाबा आढाव व प्रा.विठ्ठल बन्ने हे उपस्थित होते. येथे प्रत्येक ठिकाणी देवदासींची भाषणे होऊन त्यांनी आपल्या व्यथा मांडल्या. यावेळी विविध स्वयंसेवी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या वतीने निवेदने स्वीकारण्यात आली. या चर्चासत्रासाठी हजर असलेले पोलीस अधिकारी, केंद्राचे महानिरीक्षक श्री. भास्करराव मिसर आणि त्यांचे सहकारी पश्चिम विकास महामंडळाच्या माजी संचालिका श्रीमती लीना मेहंदळे विविध ठिकाणाचे समाजकल्याण खात्याचे सभापती,समाजशास्त्राचे अभ्यासक महिला कार्यकर्त्या यांनीही या चर्चासत्रामध्ये सूचना केल्या.[३९]

## देवदासीबरोबर वेश्यांच्या पुनर्वसनाची गरज- १९९२

देवदासी प्रथेमुळेच वेश्या व्यवसाय वाढीस लागतो. श्रीमती छाया दातार यांच्या मते देवदासी प्रथेविरुध्द अनेक समाजसुधारकांनी आजपर्यंत आवाज उठविला. याचे मुख्य कारण या प्रथेमुळे वेश्याव्यवसायाला खतपाणी मिळते व तो वाढीस लागतो. देवदासी प्रथेमध्ये मुलीला वयात येण्यापूर्वी देवाला सोडले जाते व कोवळ्या वयात त्यांचे भवितव्य ठरविले जाते. मुलीला देवदासी सोडण्यामागे

बरीच कारणे असतात. घरांमधील आजारपण दुर व्हावे, खरुज, नायटे झाले असतील तर ते बरे व्हावेत, केसांमध्ये जट आली, देवांचे बोलावणे आले आहे असे समजून मुलीला देवीला वाहिले जाते. या सर्व कारणावरुन देवदासी प्रथा ही अंधश्रध्दा आहे असे म्हणण्यास बळकटी येते. त्याच्या जोडीला प्रामुख्याने ही प्रथा मांग, महार, चांभार या अस्पृश्य जातीत घरातही चालत आलेली आहे. जोपर्यंत अंधश्रध्दा दूर होत नाही तोपर्यंत अशिक्षितपणा जाणार नाही व वेश्या व्यवसायामध्ये भरती होणे बंद होणार नाही. ज्या मुली या प्रथेच्या बळी आहेत, त्यांचे पुनर्वसन करण्याची जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे. ''सरकारने नेमलेल्या अध्यासगटाचे हेच निष्कर्ष जर वैज्ञानिक पध्दतीने केलेल्या समाजशास्त्रीय संशोधनाच्या निकषांवर टिकू शकतात का ? आज मोठ्या शहरात जे वेश्या व्यवसाय सुरु आहेत त्यांची मुळे देवदासी प्रथेमध्ये शोधणे बरोबर आहे काय ? उद्या देवदासी प्रथा बंद झाली तर, वेश्या व्यवसाय बंद होईल का ? ज्या देशामध्ये देवदासी प्रथा नाही त्या देशामध्ये वेश्या व्यवसाय नाही का ?'' असे अनेक प्रश्न त्यांनी उपस्थित केले आहेत.[४०] सर्वात महत्वाचा प्रश्न म्हणजे मुंबई, पुणे, कोल्हापूर, धारवाड, बेळगाव, अथणी या शहरभागातील वेश्यांमध्ये देवदासींचे प्रमाण मोठे आहे. हे प्रमाण किती आहे ? तसेच सद्याच्या जनगणनेत देवदासी जात वेगळी मानली जात असल्याने किती देवदासी वेश्या व्यवसाय करतात हे कळणे अवघड आहे. एका आकडेवारीप्रमाणे १९२८ मध्ये मुंबईमध्ये वेश्यांमध्ये १६% देवदासी असल्याचे नमूद आहे.[४१] भारतामध्ये वेश्याव्यवसायातील भरती ही दुष्काळी प्रदेशातून, जमीन नसलेल्या अस्पृश्य जातीतून होते. तेंव्हा देवदासी प्रथा नसतानाही याच जातीतून वेश्या निर्माण होणार हे सहज दिसून येते.

देवदासी स्त्रीचे देवाशी लग्न लागल्यामुळे ती मर्त्य नवऱ्याच्या जबाबदारीतून मुक्त झालेली असते. तेंव्हा पोट भरण्यासाठी ती वेश्या व्यवसायात भरती होते. हा निर्णय किंवा तिच्या बालविवाहाचा निर्णयही तिचे आई-वडील, भाऊच घेत असतात. पुढे ती परितक्त्या झाली तरी त्याचे परिणाम तिलाच भोगावे लागतात. जेवढा बालविवाहासारखा अन्याय आईवडील मुलीवर करतात तेवढाच अन्याय ते मुलीला देवदासी करण्यावरही करत असतात. तसेच ज्या भागामध्ये देवदासी प्रथा चालू आहे तो भागच वेश्या व्यवसायाला पोषक आहे. येथून भरती चालू राहणारच वेश्याव्यवसायाला सामाजिक मान्यता देण्याचे कार्य देवदासी प्रथेकडून होते. म्हणूनच कदाचित देवदासी प्रथा या भगात टिकून राहिली असावी. शासनाने देवदासीप्रमाणे वेश्याव्यवसाय निर्मूलनासाठी काही उपाय योजावेत. त्यांना पुनर्वसनाची संधी उपलब्ध

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

करुन दयावी. असे छाया दातार यांना वाटते. आज मात्र सुधारक केवळ देवदासीपुरतेच आपले ध्येय मर्यादित ठेवीत आहेत ते वेश्यांचा विचार करीत नाहीत अशी खंतही त्यांनी व्यक्त केली आहे. आज देवदासींना पेन्शन योजना लागू आहे. त्यांच्या मुलांसाठी ठिकठिकाणी वसतिगृह चालविण्यात येत आहेत. पण वेश्यांचे काय? जी पेन्शन देवदासीला मिळते. ती वेश्येलाही मिळावी कारण वृध्दपणी त्या स्त्रियांचे फार हाल होतात. भिक मागून त्यांना पोट भरावे लागते. थोडक्यात वेश्या व्यवसायाच्या पुनर्वसनाचा आणि देवदासी प्रथा नष्ट होण्याचा कसा एकमेकांशी संबंध येतो हे ही त्यांनी स्पष्ट केले आहे.

## १९९४ ते १९९७ या काळातील देवदासी प्रथे संबंधातील परिपत्रके

देवदासींच्या पुनर्वसनाच्या संदर्भात देवदासी कल्याण गटाचे अध्यक्ष श्री.प्रकाश आवाडे यांच्या समितीने शासनाला सादर केलेला शिफारशीवर शासनाने निर्णय घेऊन त्यासंबंधी आदेश दिले. याचवेळी समाजकल्याण मंत्री ना.एकनाथ गायकवाड यांनी आपण करीत असलेले आंदोलन मागे घ्या असे लेखी पत्र २४ मार्च,१९९४ मध्ये देवदासी मुक्ती संघटनेच्या अध्यक्षांना दिले. परंतु तोपर्यंत पुणे, सांगली, मुंबई, सोलापूर इ. ठिकाणचा सत्याग्रहींचा मोर्चा विधानसभेवर गेल्याने शेवटी समाज कल्याणमंत्र्यांना कायदा पुनर्वसनाविषयी शासनाचा पहिलाच आदेश काढवा लागला. शासन परिपत्रक (क्री.एस.आर.१०९३/ प्र. क्र.३९६/सुधार-१ मंत्रालय मुंबई - ३२) दि. १३ मे १९९४ हा देवदासींच्या विषयासंबंधी २२ वर्षाच्या चळवळीनंतर निघालेला पहिला जी.आर.या आदेशात कायदा, संजय गांधी निराधार योजना, बीज भांडवल योजना, मुलांमुलींना शिक्षण सहाय्य घरकुल योजना, निर्वाहनिधी, प्रबोधन कार्य सहाय्य अशी ६ कलमे होती. या सर्व कलमांची अंमलबजावणी विधी व न्याय विभाग, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, महिला व बालकल्याण विभाग, ग्रामविकास व जलसंधारण विभाग असा विविध भागांकडे सोपविण्यात आली. परंतु या कुठल्याच विभागाने देवदासींच्या व त्यांच्या मुलांच्या पुनर्वसनाचे कुठलेच कार्य पूर्ण केले नाही.[४२]

पुर्वसनाची चळवळ चालविणाऱ्या कार्यकर्त्यांनी देवदासींच्या कार्यांसाठी मंत्र्याच्या अध्यक्षतेखाली तज्ञ, अभ्यासू, माहितगार सदस्यांसह एक पुनर्वसन कक्ष नेमा व त्यांच्याकडे सर्व कार्यवाही सोपवा अशी मागणी केली होती पण त्याची अमंलबजावणी झाली नाही. पुढे २९ ऑगस्ट १९९४ च्या वर्षी एक परिपत्रक काढले, कुठला खर्च हा कुठे टाकावा, अधिवेशनात बील मांडावे इ. ७ सूचनाचे हे

परिपत्रक होते. पुढे याच परिपत्रकावर शुध्दीपत्रक म्हणून दि. २४ ऑक्टो १९९४ रोजी आणखी एक पत्र काढले यामध्ये बीज, भांडवलवादी खर्चाबाबत पूर्वीच्या आदेशात बदल झाल्याचे नमूद करण्यात आले होते. पुढे १९९५ मध्ये प्रा.विठ्ठल बन्ने, श्री. राम कारागीर, मा.बबनराव घोलप यांनी सांस्कृतिक मंत्री प्रमोद नवलकर व मा. मुख्यमंत्री मनोहर जोशी यांची भेट घेतली. श्री.बबनराव घोलप यांनी कटाक्षाने त्यामध्ये लक्ष घालून २९/७/१९९५ रोजी एक संयुक्त मिटींग बोलावून युतीशासनाचे पहिले अधिवेशन सुरु केले होते. [४३]

त्यानंतर महिला व बालकल्याण खात्यामार्फत १ मे १९९६ रोजी एक नवीन परिपत्रक काढले त्यात दोन कलमे होती.

१. ५० वर्षावरील देवदासींना संजय गांधी निराधार योजना देताना ती देवदासी असल्याचा महिला, बालकल्याण अधिकाऱ्याचा दाखला आणि वयाचा दाखला या दोनच अटी घालाव्यात.

२. देवदासी या व्याख्येमध्ये देवदासी म्हणजे देवाला / देवीला वाहिलेल्या स्त्रिया किंवा नंपुसक यांचा अंर्तभाव होईल. [४४]

अशाप्रकारचे दोन कलमे परिपत्रक निघाले होते पण लवकरच पुन्हा २ सप्टेंबर १९९७ रोजी आणखी एक ९ कलमी परिपत्रक प्रस्तुत करण्यात आले. त्यामध्ये देवदासींचे अनुदान वाढविण्यात आले. पण त्यात जोगत्यांचा विचार केला नाही. यावेळी देवदासींना मासिक ३००/- रु. निर्वाह अनुदान देण्यात यावे व ही प्रक्रिया तातडीने सुरु करण्यात यावी. असा आदेश संबंधित कार्यालयांना देण्यात आला होता असे दिसते. [४५]

## महाराष्ट्र व कर्नाटकातील देवदासी, मुरळयांच्या संस्था व संघटना

आजदेखील देवदासी, मुरळी प्रथा संपुष्टात आणण्यासाठी निरनिराळया संस्था जिल्हयातील विविध भागात कार्यरत आहेत. देवदासी प्रथेचे उच्चांटन, त्यांचे पुनर्वसन व त्यांच्या मुलांमुलींचे संगोपन करण्यासाठी महाराष्ट्र व कर्नाटक सरकार सतत कार्य करीत आहे. त्यामध्ये देवदासी मुक्ती संघटना गडहिंग्लज, महाराष्ट्र मल्लार समाज विकास संघटना कोल्हापूर सांगली संस्था, सावित्री, रमा, वीरांगणा मुक्ती संघटना निपाणी, महिला उत्थान संस्था यल्लमापूर-बेळगाव, अंधश्रध्दा निर्मूलन समिती आंबेवाडी-बेळगाव, राज्य महिला विकास पुनर्वसन योजना सौंदत्ती - बेळगाव, महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती

सातारा, देवदासी वेश्या आधार निहार केंद्र पुणे, स्त्री आधार केंद्र पुणे, देवदासी पुनर्वसन केंद्र कामाठीपुरा-मुंबई, भारतीय आरोग्य संघटना दिल्ली[४६] याशिवाय जयगंगा तारा कलाकार संघटना सांगली, सतशील देवदासी पुनर्वसन मंडळ सांगली, मच्छिल देवदासी पुनर्वसन मंडळ सांगली, भगिणी निवेदिता प्रतिष्ठान संचलित प्रशिक्षण केंद्र जत, दलित मानवी संरक्षण संघटना आजरा, देवदासी मुक्ती संघ आजरा, अंधश्रध्दा निमूर्लन समिती सातारा, जयमल्हार वाघ्यामुरळी संघटना पाली, आखिल भारतीय देवदासी संस्था पुणे, देवदासी मुक्ती संघटना भुदरगड, देवदासी महिला विकास केंद्र मुंबई इ. प्रकारच्या निरनिराळया संस्था देवदासी व मुरळी प्रथा व त्यांचे पुनर्वसन करण्याचे कार्य करीत आहेत.

## देवदासींच्यासाठी कल्याणकारी योजना

देवदासीसाठी अनेक कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. या योजनेमध्ये पूर्वीच्या योजनेपेक्षा काही प्रमाणात फरक आढळतो. त्या अशा आहेत.

१) **निर्वाह योजना** :- गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागातून राबविण्यात येणाऱ्या ' संजय गांधी निराधार ' योजनामध्ये ' देवदासी' ही स्वतंत्र वर्गवारी घालून सदर योजनेचा लाभ देवदासींना देण्यात येत होता. आता त्या ऐवजी ४० वर्षावरील आर्थिकदृष्टया मागासलेल्या देवदासींना उदरनिर्वाह म्हणून दरमहा रुपये ३००/- इतके निर्वाह अनुदान महिला व बालकल्याण विभागातून देण्यास शासन मान्यता देत आहेत.

२) **देवदासी अथवा देवदासींच्या मुलींच्या विवाहासाठी अनुदान** - १८ वर्षावरील आर्थिकदृष्टया मागासलेल्या अविवाहीत देवदासी आणि देवदासींच्या मुलींच्या विवाहासाठी रुपये १०,०००/- विवाह अनुदान देण्यात येते.

३) **शैक्षणिक मदत** - आर्थिकदृष्टया मागासलेल्या देवदासींच्या इ. १ ते १० वी तील मुला-मुलींचे शैक्षणिक दृष्टया पुनर्वसन होण्यासाठी गणवेश, क्रमिक पुस्तके, वहया व इतर लेखन साहित्य घेण्यासाठी मुलीला रुपये ४००/- व मुलाला रुपये ३७०/- अनुदान देण्यात येत आहे.

४) **बीज भांडवल योजना** - देवदासींना उद्योगधंदा किंवा कुटीर उद्योग सुरु करण्यासाठी बीज भांडवल योजना लागू करण्यात आली आहे.

५) **<u>प्रशिक्षण केंद्रे</u>** - देवदासींचे योग्य प्रकारे पुनर्वसन होऊन त्या योग्य मानाने जगण्यासाठी निरनिराळ्या ठिकाणी पंजीकृत संस्थामार्फत प्रशिक्षण केंद्रे ही चालविली जातात. त्याव्दारे देवदासींना विविध व्यवसायिक प्रशिक्षण दिले जाते. शासनाच्या मान्यतेनुसार संस्थेस अनुदान देण्यात येते.

६) **<u>देवदासींच्या मुलामुलींसाठी वसतिगृहे</u>** - देवदासींच्या मुलामुलींचे शैक्षणिक दृष्टया पुनर्वसन व त्यांच्या निवासाची सोय होण्यासाठी पंजीबध्द स्वयंसेवी संस्थेमार्फत वसतिगृहे चालविली जातात. यासाठी संस्थेस प्रति लाभार्थी दरमहा रु. ५००/- आवर्ती प्रशिक्षण अनुदान देण्यात येते.[४७]

अशाप्रकारे देवदासींसाठी कल्याणकारी योजना राबविल्या जात असल्याची नोंद महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे आहे. जरी या योजना देवदासीसाठी राबविल्या जात असल्या तरी आज सद्याच्या महागाईची बाब लक्षात घेऊन सदरच्या योजनेत वाढ करण्यात यावी अशी देवदासींची मागणी आहे. कारण केवळ तीनशे रुपयात आजच्या महागाईत महिना चालविणे शक्य नाही. याशिवाय देवदासी मुक्ती संघटनेचे जे अंतर्गत व्यवस्थापन आहे. त्याची पुर्नरचना करण्यात यावी. तसेच या संघटनेमार्फत देवदासीसाठी जे लघुउद्योग, कुटीरउद्योग केले जातात त्यांच्या उपक्रमाला सरकारी संरक्षण देण्यात यावे अशी मागणी आहे.

## <u>देवदासी मुक्ती संघटनेच्या मागण्या १९९८ - १९९९</u>

देवदासी मुक्तीसाठी अद्यापही ठोस असे काहीच प्रयत्न झालेले नाहीत. कुठे १००/-रुपये कुठे ३००/- रुपये दिले म्हणजे देवदासींचे पुनर्वसन झाले असे नाही तर सरकारने आजच्या महागाईचा विचार करुन त्यांच्या निर्वाह निधीत वाढ करावी. तरच ही प्रथा संपुष्टात येईल. म्हणून देवदासी मुक्ती संघटनेने सरकारपुढे काही मागण्या मांडल्या. त्या मागण्या अशा -

१. सरकारने गडहिंग्लजमध्ये जशी देवदासी प्रशिक्षण केंद्रे स्थापन केली तशीच प्रशिक्षण केंद्रे, मुक्ती केंद्रे इतर जिल्हयातही स्थापन करावीत. जर अशी केंद्रे जागोजागी उभारली तर कदाचित ही प्रथा नष्ट होईल. अशी आशा देवदासी मुक्ती संघटनेला आहे.

२. देवदासी पुनर्वसनाच्या चळवळीत भाग घेतलेल्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी ही चळवळ कोणताही स्वार्थ हेतू न ठेवता पुढे नेटाने चालविली पाहिजे. अशी मागणी ही संघटना करीत आहे.

३. ४० वर्षाच्या पुढील देवदासींना, जोगत्यांना, महिना १०००/-, कुटुंब निर्वाह निधी दयावा.

४. तरुण सक्षम महिलांना व्यवसाय व्यापारासाठी, काही कर्ज, जागा, गाळे, व्यापाऱ्यांचा सुविधा उपलब्ध करुन दयावी.

५. देवदासींच्या मुलांमुलींना निवासी सर्व प्रकारचे शिक्षण मोफत विनाशुल्क मिळावे तसेच त्यांना मासिक १००/- रुपये प्रमाणे विद्यावेतन मिळावे.

६. शासकीय, मान्यता प्राप्त संस्था, सहकारी संस्था इ. ठिकाणी नोकऱ्या मिळण्यास मार्गदर्शक सूचना व्हाव्यात. देवदासींच्यासाठी २% आरक्षण ठेवावे.

७. विवाह अनुदानात २०,००० पर्यंत वाढ व्हावी.

८. किमान २ खोल्या, पाणी प्रकाश, आरोग्य सोयीचे घरकुल उपलब्ध व्हावे.

९. उद्योग प्रशिक्षण केंद्रे सुरु करावीत.

१०. देवदासी सोडणे गुन्हा ठरविणारा कायदा त्वरीत अंमलात आणून सर्व धर्मपंथाला लागू करावा.

११. देवदासी प्रथा सर्व देशातच प्रचलित आहे तेव्हा राष्ट्रीय कायदा करा.

१२. या सर्व तरतुदीचा लाभ तिला, तिच्या कुटुंबाला तातडीने व विनाजाच मिळावा म्हणून समाज कल्याण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक सुटसुटीत ॲक्शन कमिटी नेमण्यात यावी. या कमिटीवर तज्ञ, अभ्यासू, अनुभवी असे दोन सभासद नेमावेत. तसेच त्यामध्ये महिलांचा ही समावेश असावा. स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा अधिकार या कमिटीला असावा. [४८]

या सर्व तरतुदी शासनाने ताबडतोब अंमलात आणाव्यात यासाठी देवदासी मुक्ती संघटनेच्या अध्यक्षांनी मुंबईत बेमुदत उपोषण सुरु केले होते. त्यावेळी त्यांनी देवदासींच्या मागणीसाठी तीन शतके विविध पातळीवर लढा सुरु असून अखेरची लढाई म्हणून उपोषणाला बसल्याचे जाहीर केले. आता शासनाने देवदासी प्रथा बंदी कायदा केल्याशिवाय व प्रकाश आवाडे समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी झाल्याशिवाय मागे हटणार नाही अशी घोषणा केली होती. त्यांच्या या बेमुदत उपोषणामुळे राज्यातील देवदासींना विमा संरक्षण देण्यात येणार असल्याचे आश्वासन महिला व बालकल्याणमंत्री हर्षवर्धन पाटील यांनी देवदासी मुक्ती संघटनेच्या शिष्टमंडळांना दिले. देवदासींच्या सर्व मागण्या मान्य करुन त्यांना निर्वाह भत्ता देण्याचेही शासनाने मान्य केल्याचे दिसते. [४९]

अशाप्रकारे अद्यापही शासन दरबारी देवदासींच्या मागण्यांसाठी संघर्ष सुरु आहे असे दिसते.

## देवदासी पुनर्वसनाची खरी गरज

कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, पुणे, मुंबई, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्हयामध्ये देवदासींचे प्रमाण जास्त आहे. या भागात आजदेखील बऱ्याच देवदासी डोक्यावर रेणुका देवीचा जग व हातात यल्लम्माची परडी घेऊन जोगवा मागताना दिसून येतात. देवदासींच्यासाठी जरी शासनाने १९९३-९४ मध्ये निरनिराळया प्रकारच्या योजना जाहीर केल्या तरी या योजनेचा लाभ सर्वच देवदासींना मिळत नाही. कारण शासनाने ४५ वय वर्ष असलेल्या देवदासी मुरळयांना, ३००/- रु. वेतन देण्याची योजना जाहीर केली होती. सुरुवातीला हे मासिक वेतन देवदासींना नियमितपणे मिळत होते. पण आता ते तीन/चार महिन्यांनी मिळते. तसेच ज्यावेळी शासनाने पेन्शन वाढविण्याचा आदेश काढला होता त्यावेळी त्याची अंमलबजावणी झाली नाही. त्यामुळे फेकून दिलेल्या परड्या आणि जग पुन्हा देवदासींनी व मुरळयांनी हाती घेऊन उपजीविका करण्यास सुरुवात केली. म्हणून त्यांचे पुनर्वसन करणे गरजेचे आहे. देवदासी ही प्रथा धर्माच्या नावाखाली रुढ असली तरी जर का देवदासी मुरळयांनी स्वत:हून या प्रथेला विरोध केला असता तर ही प्रथा केव्हाच संपुष्टात आली असती ? पण त्यांच्या मनात खोलवर रुतून बसलेल्या धार्मिक श्रध्देमुळे ते घडलेच नाही. या प्रथेविरुध्द गेले तीस वर्षे आंदोलने होत आहेत. सभा, मेळावे, ठराव, मोर्चे, उपोषणे, प्रबोधन अशा सर्व सनदशीर मार्गाने या प्रथेचे समूळ उच्चाटन करण्यासाठी ठिकठिकाणी संघर्ष होत आहेत. आधी संपूर्ण देशासाठी देवदासी प्रथा प्रतिबंधक कायदा करा अशी मागणी देवदासी मुक्ती संघटनेने १९९० साली केली होती. पण त्याचीही अंमलबजावणी झाली नाही. एकूणच शासनाच्या या उदासीन भूमिकेमुळे देवदासींच्या बाबत अनेक प्रश्न निर्माण होतात. आतापर्यंत किती देवदासींना निर्वाह निधी मिळाला ? कितीजणींना नोकऱ्या मिळाल्या ? कितीजणांनी घरकुल, निवारा, विवाह अनुदान मिळून कितीजणींचे संसार उभारले ? सरकारने कितीजणींना देवदासी होण्यापासून रोखले आहे ? महाराष्ट्रात किती वसतिगृहे, प्रशिक्षण केंद्रे उभारली गेली ? एकूणच गडहिंग्लज, जत, सांगली जिल्हा येथे अपवाद वगळता कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे, मुंबई अशा १० ठिकाणी तूर्त प्रशिक्षण केंद्रे उभारावीत अशीही मागणी देवदासी मुक्ती संघटनेचे कार्यकर्त्यांनी केली होती. [५०]

पुढे त्या मागण्यांचा विचार करुन शासनाने १९९९ च्या हिवाळी अधिवेशनात देवदासी प्रथा प्रतिबंधक कायदा पास करण्याची घोषणा केली होती. पण आज या गोष्टीला ५ वर्षे झाली तरी कायदा पास

होतोच आहे. शासनाच्या या उदासीन भूमिकेमुळेच चळवळीला हिंसक रुप प्राप्त झाले आहे. त्यामुळे देवदासी मुक्ती चळवळीतील कार्यकर्त्यांची सहनशक्तीसुध्दा लोप पावली आहे. अद्यापही शासन दरबारी देवदासींच्या मागण्यासाठी संघर्ष सुरु आहे. आजमितीलाही महिन्याभरात प्रलंबित मागण्या मान्य न झाल्यास विधानसभेच्या दारात जाऊन देवदासी सरकारला जाब विचारतील असा इशारा, जनता दलाचे प्रदेशाध्यक्ष ॲड, श्री. श्रीपतराव शिंदे यांनी केला. यावेळी गावात स्वत:चे घर वा शेत नाही असा देवदासींना इंदिरा घरकुल योजनेतून व अन्य शासकीय योजनेतून घरे बांधून मिळावीत. देवदासींच्या मुलांला मोफत शिक्षण व नोकरी मिळाली पाहिजे इ. मागण्याही केल्या. ॲड. शिंदे, डॉ. सुधाकर गोकाककर, बापू मेस्त्री यांच्या नेतृत्वाखाली गडहिंग्लज येथील महालक्ष्मी मंदिरापासून मोर्चास सुरवात झाली. देवदासींनी प्रांत कार्यालयासमोर जोरजोरात घोषणाबाजीने निदर्शने केली. देवदासी प्रतिबंधक कायदा शासनाने ताबडतोब अंमलात आणावा. देवदासींच्यांसाठी असलेल्या घराचे घरभाडे माफ करावे, देवदासींना दरमहा २००० रुपये पेन्शन मिळावी व त्यांना पिवळे रेशनकार्डही मिळाले पाहिजे इ. प्रलंबित मागण्याचे निवेदन तहसीलदार आर.जी. गायकवाड यांच्याकडे देण्यात आले. यावेळी डॉ. सुधाकर गोकाककर, दत्ता मगदूम, चंद्रकांत नेवलेकर, बापू मेस्त्री यांची भाषणे झाली. मोर्चेत नगरसेविका शोभा धोंड, दादू पाटील, जिल्हा परिषदा अध्यक्षा सौ. व्हनबट्टे, चंद्राबाई बारामतीकर, उदय कदम, यांच्यासह आजरा, चंदगड तालुक्यातील शेकडो देवदासी सहभागी झाल्या होत्या असे दिसते.[५१] यावरुन आजमितीलाही देवदासी स्त्रियांची काय परिस्थिती आहे याची प्रचिती येते. त्यामुळे आज देवदासींचे पुनर्वसन करणे ही एक काळाची गरज आहे असे दिसून येते.

एकूणच देवदासी पुनर्वसनाच्या निमित्ताने सुरु झालेली स्त्रियांच्या उन्नतीची चळवळ आज एकाकी आहे याचे कारण म्हणजे चळवळ चालविणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये वैचारीक ताणतणाव, शासकीय सेवेतील उच्चवर्णीय अधिकारी, बदलते राजकारण, राजकर्त्यांमधील बदलते धोरण, योजना कार्यान्वित करण्यासाठी मिळणारे अर्थसहाय्य व होणारा विलंब या सर्वामध्येच एक विसंगती आहे. जरी शासनाने आजमितीलाही देवदासींच्या मागण्या मान्य केल्यातरी भविष्यात तिची किती प्रमाणात अंमलबजावणी होईल याकडे सर्वांचे लक्ष आकर्षित झालेले आहे असे दिसून येते.

# तळटिपा आणि संदर्भ


१) देवदासी मुक्ती संघटनेचे अध्यक्ष प्रा.विठ्ठल बन्ने यांची प्रत्यक्ष मुलाखत ३० नोव्हेंबर २००३.

२) डॉ.बाबा आढाव - पुरोगामी सत्यशोधक जाने. ते मार्च १९८०
भंडारी मुद्राणालय, नारायण पेठ, पृ.क्र.४.

३) श्री. बळवंत कांबळे - नापत (कादंबरी)
प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९७३, पृ.क्र. ९.

४) श्री.वसंत राजस - देवदासी - शोध आणि बोध
सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे,
प्रथमावृत्ती, जुलै १९९७, पृ.क्र. ५७.

५) श्री.बळवंत कांबळे - भारतातील देवदासी प्रथा, चळवळ व पुनर्वसन
श्रीविद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे,
प्रथमावृत्ती १८ मे २०००, पृ.क्र. ५२.

६) डॉ. लीला पाटील - भारतीय स्त्री जीवन, मेहता प्रकाशन,
१२१६ सदाशिव पेठ, पुणे,
प्रथमावृत्ती सप्टेंबर १९९०, पृ.क्र. ७९, ८०.

७) डॉ.अनिल अवचट - पुरोगामी सत्यशोधक जानेवारी ते मार्च १९८०,
भंडारी मुद्रणालय, नारायण पेठ, पुणे, पृ.क्र.५.

८) डॉ. मदन कुलकर्णी - देवदासी यल्लमाच्याजोगतिणी विजय प्रकाशन,
हनुमान गल्ली, सीताबर्डी, नांगपूर,
प्रथमावृत्ती २३ जून १९९४, पृ. ७७.

९) दैनिक केसरी - १९ फेब्रुवारी १९८४

१०) श्री.बळवंत कांबळे; उपरोक्त, पृ. ५२.

११) डॉ.मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. ७८.

१२) श्री.उत्तम कांबळे - देवदासी आणि नग्नपूजा
न्यू एज प्रिटिंग प्रेस, भूपेश गुप्ता भवन,सयानी रोड,
प्रभादेवी मुंबई, चौथी आवृत्ती २००२, पृ.क्र. ३२.

१३) डॉ.नरेंद्र दाभोळकर - अंधश्रध्दा विनाशाय, राजहंस प्रकाशन, पुणे,
१९९०, पृ.क्र. १८९.

१४) मच्छिल देवदासी पुनर्वसन सांगली मंडळाच्या अध्यक्षा कै. श्रीमती सलामा शिराळकर यांची प्रत्यक्ष मुलाखत - ३०/११/२००३.

१५) दैनिक तरुण भारत - १ डिसेंबर २००३.

१६) मुलाखत - प्रा. विठ्ठल बन्ने १ जून २००५.

१७) उत्तम कांबळे; उपरोक्त, पृ. ३०.

१८) डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. ७६.

१९) वसंत राजस; उपरोक्त, पृ. ५८.

२०) डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. ८१.

२१) वसंत राजस; उपरोक्त, पृ. ५७.

२२) कित्ता; पृ. ५८.

२३) श्री बळवंत कांबळे; उपरोक्त, पृ.५१.

२४) डॉ. मदन कुलकर्णी; उपरोक्त, पृ. ७६.

२५) मुलाखत - प्रा. विठ्ठल बन्ने ३०/११/२००३.

२६) देवदासी मुक्ती संघटनेचे कार्यकर्ते (गारगोटी) कै. डॉ. आनंद वास्कर यांची प्रत्यक्ष मुलाखत दि.७/१२/२००३.

२७) मुलाखत - कै. श्रीमती सलमा शिराळकर ३०/११/२००३.

२८) श्री बळवंत कांबळे; उपरोक्त, पृ. ६२.

२९) कित्ता; पृ. ६१.

३०) कित्ता; पृ. ६१.

३१) जय-मल्हार वाघ्या मुरळी संघटनेचे अध्यक्ष (पाली) श्री. बाबासो कृष्णा बोधे यांची प्रत्यक्ष मुलाखत ३ जुलै, २००५.

३२) आखिल भारतीय देवदासी संस्थेचे कार्यकर्ते (पुणे) सदाशिव भालेराव यांची प्रतयक्ष मुलाखत दि. १ जून, २००५.

३३) मुलाखत - प्रा. विठ्ठल बन्ने ३०/११/२००३.

३४) देवदासी महिला विकास केंद्राचे कार्यकर्ते (मुंबई) श्री. विष्णूपंत जाधव यांची प्रत्यक्ष मुलाखत दि. १ जून, २००५.

३५) मुलाखत - कै. श्रीमती सलमा शिराळकर दि. ३०/११/२००३.

३६) उत्तम कांबळे; उपरोक्त, पृ. ४०, ४१.

३७) देवदासी कल्याण अभ्यास गटाचा अहवाल -३० जून, १९९०.

३८) बळवंत कांबळे; उपरोक्त, पृ. ४४ ते ४९.

३९) कित्ता; पृ. ६४.

४०) छाया दातार - अंधश्रध्दा निर्मूलन कायदा आणि देवदासी प्रश्न साप्ताहिक सकाळ २१ सप्टेंबर १९९१.

४१) कित्ता; पृ. ४.

४२) मुलाखत - प्रा. विठ्ठल बन्ने दि. १ जून, २००५.

४३) बळवंत कांबळे; उपरोक्त (प्रस्तावना), पृ. २६, २७.

४४) कित्ता; पृ. २७.

४५) मुलाखत - कै. श्रीमती सलमा शिराळकर दि. ३०/११/२००३.

४६) वसंत राजस; उपरोक्त, पृ. ६१.

४७) महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र शासन परिपत्रक १९९७.

४८) बळवंत कांबळे; उपरोक्त, पृ. ३८, ३९.

४९) दै. लोकमत दि. ३१/३/२००५.

५०) मुलाखत - प्रा. विठ्ठल बन्ने १/६/२००५.

५१) दै. लोकमत दि. ११/८/२००५.